# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### लोणावळा (ता.मावळ, जि.पुणे) नगरपालिका हद्दीतील विकास कामे परवानगीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(१) ५२५३९ (१७-०५-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणावळा (ता.मावळ, जि.पुणे) नगरपरिषद हद्दीत नवीन बांधकाम करताना सहा मीटर सामासिक अंतर ठेवणे बंधनकारक केल्याने लोणावळा, खंडाळ्यातील बांधकामे परवानगीच्या कात्रीत सापडली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे तसेच नेमलेल्या उच्च स्तरीय समितीने सध्या बांधकाम परवानग्या नाकारल्यामुळे नागरीकांसमोरील अडचणी वाढणार असून विकासकामांमध्ये अनेक अडचणी निर्माण होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, न्यायालयाच्या या निर्णयामुळे नगरपालिका प्रशासनाने जबाबदारी नाकारली असल्याने न्यायालयात दाद कोणी मागायची हा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लोणावळा नगरपालिका हद्दीतील विकास कामांना परवानगी मिळणेबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०८-२०१८) :** (१) ते (४) भागश: खरे आहे. मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.९३/२००७ मधील आदेशानुसार नगरपरिषद हद्दीतील बांधकाम परवानगीबाबत तज्ञ समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीच्या शिफारसी नंतर नगरपरिषद हद्दीतील बांधकाम परवानगी देणेची कार्यवाही नगरपरिषदेमार्फत करण्यात येते. सदर समितीने लोणावळा शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूद क्र.३६(१) मध्ये बहुमजली इमारतींकरीता असलेली तरतूद विचारात घेऊन दि.१०/०८/२०१५ पासून नगरपरिषद हद्दीतील बहूमजली इमारतीच्या बांधकामासाठी सर्व बाजुणे ६ मी. सामासिक अंतरे

सोडण्याबाबत आदेश दिलेले आहेत. लोणावळा नगरपरिषदेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत बहुमजली इमारतीची व्याख्या नमूद नसल्याने तळ + १ मजल्याची इमारत देखील बहुमजली / विशेष इमारत गृहित धरुन आग प्रतिबंधक तरतूदी लागू करण्यात येत असल्याने सदर नियमातील त्रुटी दुर करुन ही तरतूद १५ मी. पेक्षा जास्त उंचीच्या इमारतींकरीता लागू करणे बाबत नगरपरिषदेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करुन तसा प्रस्ताव दि.३१/०३/२०१७ रोजी शासनास सादर केलेला असून त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याची कार्यवाही शासनस्तरावर अंतिम टप्प्यात आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वरळी, मुंबई येथे पदपथावरून चालणाऱ्या एका व्यक्तीला टँकरने दिलेल्या धडकेत त्यांचा झालेला मृत्यू

**(२) *८५४०२* (२३-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.ॲनी बेझंट मार्ग, वरळी, मुंबई येथे एम.एम.आर.डी.ए. कडून सुरु असलेल्या मेट्रोच्या बेशिस्त कामामुळे पदपथावरून चालणाऱ्या डॉ.कमलेश रामनारायण सिंग यांना टँकरने दिलेल्या धडकेत त्यांचा दुर्दैवी झालेल्या मृत्यूची तातडीने चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री महोद्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तदनुषंगाने सदर व्यक्तिच्या अपघाती मृत्यूची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे आणि सदर प्रकरणात दोषी आढळून आलेल्या मेट्रोच्या अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, मेट्रोची कामे सुरु असलेल्या भागात अपघात होवू नयते याकरिता शासनाने तातडीने कोणत्या आवश्यक उपाययोजना केल्या आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०७-२०१८) :** (१) होय, असे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) व (३) प्रश्नाधीन अपघात हा वरळी स्थानक बांधकामाच्या नजिकच्या अंतरावर झाला होता. या अपघाताची मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या अधिकारी व कंत्राटदारांनी सल्लागारामार्फत चौकशी केली असता, सदर अपघाताच्या ठिकाणी पदपथ पादचाऱ्यांसाठी पूर्णवेळ मोकळा होता. हा अपघात मेट्रोच्या कामकाजामुळे झालेला नसल्याचे दिसून आले आहे.

(४) व (५) मेट्रोची कामे सुरु असलेल्या ठिकाणी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन व कंत्राटदार यांच्याकडून पादचारी व वाहतूकीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पुढील आवश्यक त्या खबरदारी व उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत :- अ) बांधकाम क्षेत्रातील पदपथांवर पादचाऱ्यांच्या सुरक्षित येण्या-जाण्यासाठी स्वतंत्र मार्गिका सोडण्यात आली असून, काही ठिकाणी रेलींग करुन मार्गिका सोडण्यात आल्या असून, काही ठिकाणी रेलींग मार्गिकाही सोडण्यात आल्या आहेत. ब) मेट्रोचे बांधकाम सुरु झाल्यानंतर रस्त्याच्या दोन्ही बाजूला पादाचाऱ्यांच्या सुरक्षित येण्या-जाण्यासाठी स्वतंत्र मार्गिका सोडण्यात आल्या आहेत. क) पादचारी तसेच वाहनचालक यांच्या सुरक्षेसाठी मेट्रो बांधकामाच्या बॅरिकेडस् वर आवश्यक ते सूचना फलक, सुरक्षा सूचना, सुरक्षा चिन्हे, रोप लाइट, ब्लिंकर्स लावण्यात आले असून, ट्राफिक मार्शल नेमण्यात आले आहेत.

---

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने केलेला सन २०१६ ते २०३६ चा विकासाचा प्रारुप आराखडा**

**(३) ८५८९३ (२३-०८-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सन २०१६ ते २०३६ चा विकासाचा प्रारुप आराखडा तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा आराखडा मुंबई आणि आसपासच्या भागाच्या हिताचा नसल्याने तो रद्द करण्याची मागणी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, नगर रचना अभ्यासक यांनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या आराखडयास हरकती व सूचना शासनास प्राप्त झाल्या होत्या का, त्याचे स्वरुप काय आहे, तसेच या आराखडयात कोणत्या त्रुटी आढळून आल्या आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१८) :** (१) होय.

(२) अशा स्वरुपाची कोणतीही विनंती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास प्राप्त झालेली नसलेचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने कळविलेले आहे.

(३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दिनांक १९/९/२०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या प्रारुप प्रादेशिक योजनेवर सुमारे ६३,३०० इतक्या हरकती/ सुचना प्राप्त झाल्या आहेत. प्राधिकरणास प्राप्त सुचना /हरकतीपैकी बहुतांश हरकती शहरी भागासंदर्भात आल्या आहेत. जेथे प्रादेशिक योजनेच्या जमीन वापर/ विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतुदी लागू होत नाही. या व्यतिरीक्त, प्रारुप प्रादेशिक योजनेतील प्रस्तावित भूवापर व विकास नियंत्रण नियमावलीतील काही तरतुदींमध्ये बदल करण्याबाबत सूचना/हरकती प्राधिकरणास प्राप्त झाल्या आहेत. सदर प्राप्त सुचना/हरकतदारांना नियोजन समितीने सुनावणी देऊन त्यांचा अहवाल मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सादर केला असून, सदरची प्रारुप प्रादेशिक

योजना मुंबई महानगर नियोजन समितीने शासनास दिनांक २३/२/२०१८ रोजी मंजूरीकरीता सादर केली आहे. सदर प्रारुप प्रादेशिक योजनेवर संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय मागविण्यात आले असून, संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर त्यावर उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेला मिळणारे अनुदान आणि विविध शासकिय कार्यालयाकडून भरला जाणारा कर प्रलंबित असल्याबाबत

**(४) ८७३२८ (२३-०८-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेला शासनाकडून मिळणारे अनुदान आणि विविध शासकिय कार्यालयाकडून भरला जाणारा कर या पोटी महानगरपालिकेचे तब्बल ३५२३ कोटी रुपये अनेक वर्षापासून देय आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला रु.३५२३ कोटी निधी महानगरपालिकेला न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर निधी प्रलंबित असल्यामुळे महानगरपालिकेमार्फत मुंबई शहर व उपनगरात सुरु असलेल्या व करावयाच्या नागरी प्रकल्पांना सुरुवात करण्यासाठी आर्थिक कोंडी निर्माण झाली असल्याने सदर निधी तात्काळ महानगरपालिकेला देण्यात यावा असे मागणी पत्र मुंबईच्या महापौरांनी राज्याच्या मा.मुख्यमंत्री यांना माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान पाठविले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई वाढती लोकसंख्या आणि नागरी सुविधांची मागणी याद्दष्टीने महानगरपालिकेला नियोजन करणे व विविध प्रकल्प राबविणे सोयीस्कर व्हावे यासाठी शासनाकडे असलेला थकित निधी अदा करण्याबाबत करावयाच्या निर्णयात्मक कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे व किती कालावधीत पूर्ण निधी महानगरपालिकेला देण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१) व (२) राज्य शासनाच्या विविध कार्यालयांकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त होणारी सहाय्यक अनुदाने तसेच, मालमत्ता कर, पाणीपट्टी, मलनि:सारण आकार, शासनाच्या वतीने गोळा करण्यात आलेल्या विविध करांवरील वटावाच्या रकमा इ. पोटी महानगरपालिकेस जुलै, २०१७ अखेरपर्यंत रु. ३८८२.९५ कोटी इतकी रक्कम देय आहे.
(३) सदर प्रकरणी मा.महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक १८.०३.२०१७ रोजी पत्र पाठविले आहे.
(४) राज्य शासन व बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी परस्परांना देय असलेल्या रकमांचे समायोजन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.

---

**उल्हासनगर महानगरपालिका (जि.ठाणे) हद्दीतील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याबाबत**

**(५) ८८८२८ (२३-०८-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिका (जि.ठाणे) हद्दीतील अनाधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी राज्य शासनाने Regularisation of unauthorized Development in the City of Ulhasnagar ordinance सन २००६ कायदा अस्तित्वात आणल्यानंतर सदर कायद्याची अमंलबजावणी सन २०१० पासून न झाल्याने उक्त परिसतातील नागरिक अद्यापपर्यत मालकी हक्कापासून वंचित राहिल्याने सदर परिसरात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकाम नियमित करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनीधींकडून वारंवार मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त परिसरातील नागरीकांना तातडीने न्याय देण्याबाबत शासनस्तरावर कोणत्या उपाययोजना आणि कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०८-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) उल्हासनगर शहरातील अनाधिकृत विकासकामे नियमाधिन करणे अधिनियम-२००६ मधील कलम ३(५) मधील तरतुदीनुसार उल्हासनगर शहराच्या वेगवेगळया भागासाठी वेगवेगळी पदनिर्देशित अधिकारी नियुक्त करणेची तरतूद आहे. त्याअनुषंगाने महानगरपालिकेने शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला असून सदर बाब पडताळण्यात येत आहे. त्याचप्रमाणे राज्यातील नियोजन प्राधिकरणांच्या हद्दीमधील अनधिकृत बांधकामे प्रशमन आकार घेऊन प्रशमित संरचना म्हणून घोषित करणेबाबतचे विनियम दिनांक ७/१०/२०१७ रोजीचे अधिसुचनेन्वये प्रसिध्द केलेले आहेत. सदरचे विनियम उल्हासनगर महानगरपालिकेसही लागू राहतील. सदर विनियमानुसार जी बांधकामे प्रशमित करता येवू शकतील, अशा बांधकामावर सदर विनियमानुसार कार्यवाही होऊ शकेल.

---

**वसई-विरार उपप्रदेशातील विरार (पूर्व-पश्चिम) ते नायगाव (पूर्व-पश्चिम) या रेल्वेला समांतर रस्ता विकसित करणेबाबत**

**(६) ९१००६ (२३-०८-२०१७). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार उपप्रदेशातील विरार (पूर्व-पश्चिम) ते नायगाव (पूर्व-पश्चिम) या रेल्वेला समांतर रस्ता विकसित करणेबाबतचा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी मा.मुख्यमंत्री कार्यालयात प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कामास अंतिम मान्यता देऊन व त्यासाठी लागणारा निधी लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याची मागणी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१८) :** (१) अशी बाब नाही.
(२) होय.
(३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई महानगर प्रदेशामध्ये विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत विविध पायाभूत सुविधांची कामे करण्यात येतात. त्याअनुषंगाने वसई-विरार उपप्रदेशातील विरार (पुर्व-पश्चिम) ते नायगांव (पुर्व-पश्चिम) या रेल्वेला समांतर रस्ता विकसित करण्याबाबतचा रु. २६०० कोटीचा प्रस्ताव वसई-विरार महानगरपालिकेकडून प्राधिकरणास प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव प्राधिकरणाच्या स्तरावर तपासण्यात येत आहे.

---

## नेवासा नगरपंचायतीचा (जि.अहमदनगर) पंतप्रधान आवास योजनेच्या लाभार्थींमध्ये समावेश करण्याबाबत

**(७) ९२६३० (०४-०९-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेवासा (जि.अहमदनगर) नव्याने स्थापन झालेल्या नेवासा नगरपंचायतीचा पंतप्रधान आवास योजनेच्या लाभार्थींमध्ये समावेश करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.गृहनिर्माण मंत्री यांच्याकडे दिनांक ८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१६-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) केंद्र शासनाने सर्वांसाठी घरे या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने दि.१ डिसेंबर,२०१५ रोजी मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार दि.९ डिसेंबर,२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. आजमितीस सदरहू योजनेत ३८२ शहरांचा समावेश करण्यात आला असून त्यामध्ये नेवासा, जि.अहमदनगर या नगरपरिषदेचा समावेश आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नवी मुंबईतील सिडको निर्मित घरे, वाणिज्यक बांधकामे व भूखंड फ्री होल्ड करताना पुनर्बांधणीसाठी घातलेली ३० टक्के अतिरिक्त विकास शुल्क आकारणीची अट रद्द करण्याबाबत**

**(८) ९५०२९ (३०-१२-२०१७). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई क्षेत्रात मध्यम व अल्प उत्पन्न गटासाठी सिडकोने बांधलेल्या गृहप्रकल्पातील सदनिका तसेच वाणिज्यिक बांधकामे विकताना त्याचा ताबा कायमस्वरूपी न देता ६० वर्षाच्या लीजवर दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदनिका व वाणिज्यिक बांधकामाची संपूर्ण रक्कम संबधितांकडून घेऊन मालकी हक्क सिडकोकडेच असल्याने अशा सदनिका वा बांधकामांचा ताबा कायमस्वरूपी मिळावा म्हणून नवी मुंबईकर गत ४६ वर्षांपासून सिडकोकडे पाठपुरावा करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिडकोने माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सिडको विकसित जमिनी फ्री होल्ड करतांना त्याच्या पुनर्बांधणीसाठी ३० टक्के शुल्काचा अतिरिक्त भार लीजधारकांवर टाकण्याचा निर्णय घेऊन प्रस्ताव मंजुरीसाठी शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ३० टक्के अतिरिक्त शुल्काची अट रद्द करण्यात यावी असे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने अतिरिक्त ३० टक्के शुल्क रद्द करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय व त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१८) :** (१) होय.

नवी मुंबई क्षेत्रातील संपादित केलेल्या जमिनीतील भूखंड ६० वर्षाच्या भाडेपट्टा करारान्वये देण्याचे सिडकोचे प्रचलित धोरण असून त्यानुसार रहिवास व वाणिज्यिक प्रयोजनार्थ निश्चित केलेल्या दराने सिडकोमार्फत भूखंड भाडेपट्याने वितरीत करण्यात येतात.

(२) होय.

(३), (४) व (५) नवी मुंबई येथील सिडकोच्या मालकीच्या भाडेपट्टयाने (लिज होल्ड) वाटप केलेल्या जमिनी भाडेपट्टामुक्त (फ्रि होल्ड बेसिस) स्वरुपात करण्यासंदर्भात सिडको संचालक मंडळाने दि.११.८.२०१७ रोजीच्या बैठकीत ठराव क्र.११९१२ मंजूर केला असून तो शासनास प्राप्त झाला आहे. तथापि, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने आवश्यक असणारी अधिकची माहिती सिडकोकडून मागविण्यात आली असून त्यानंतर उक्त प्रकरणी उचित निर्णय घेण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेने सन २००७ पासून आजपर्यंत विविध ४८ प्रकल्प व योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सल्लागारांची नियुक्ती केली असल्याबाबत**

**(९) ९९५६७ (०३-०१-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराच्या विकासाच्या दृष्टीने महानगरपालिकेने सन २००७ पासून आजपर्यंत विविध ४८ प्रकल्प व योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सल्लागारांची नियुक्ती केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पातील १८ प्रकल्प पाणीपुरवठा, उर्वरित ३० प्रकल्प उड्डाणपूल उभारणे,भुयारी मार्ग बांधणे, नदी सुधारणा संदर्भात असून त्यापैकी २५ प्रकल्प विविध कारणांमुळे अपूर्ण असूनही या सल्लागारांना महानगरपालिकेने ४२ कोटी रुपयांपेक्षा अधिक शुल्क अदा केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, २५ हून अधिक अपूर्ण प्रकल्पाचे किंमतीत कोट्यवधी रुपयांची वाढ झाल्याने नागरिकांना व महानगरपालिकेला आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २००७ पासून महानगरपालिकेने कोणकोणते प्रकल्प हाती घेतले व त्यातील किती प्रकल्पांसाठी सल्लागार नेमण्यात आले, त्या प्रकल्पांची नावे काय आहेत, प्रकल्पांसाठीच्या सल्लागारांची नावे, प्रकल्प सुरु झाल्यापासून झालेला खर्च,सल्लागारांना दिलेल्या रकमेची प्रकल्पनिहाय माहितीबरोबरच अपूर्ण प्रकल्पांची संपूर्ण माहिती मिळावी तसेच सदर प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) पाणीपुरवठा विभागाकडील १८ प्रकल्प असून या प्रकल्पांसाठी आजपावेतो र. रुपये १९.४९ कोटी इतकी फी सल्लागार यांना आदा केली आहे,

तसेच प्रकल्प विभागाकडील ३० प्रकल्प असून या कामांसाठी आजपावेतो र. रुपये २७.६६ कोटी इतकी फी तज्ञ सल्लागार यांना आदा केलेली आहे.

तथापी निविदा अटी व शर्तीनुसार ठेकेदाराची कामाची प्रगती संथ असल्यास ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करणेत येते. तसेच भाववाढ सूत्राचे इंडायसेस फ्रिज करणेची कारवाई करणेत येते. त्यामुळे प्रकल्पाचे खर्चामध्ये कोणतीही वाढ होत नाही.

(४) व (५) पाणीपुरवठा विभागाकडील १८ पैकी ०९ प्रकल्प पूर्ण झाले असून उर्वरित ०९ प्रकल्पांची कामे प्रगती पथावर आहेत. प्रकल्प विभागाकडील ३० प्रकल्पांपैकी १८ प्रकल्पांची कामे पूर्ण झालेली असून १० प्रकल्पांची कामे चालू असून १ प्रकल्पाचे काम भू संपादना अभावी प्रलंबित आहे व १ काम राष्ट्रीय राजमार्ग प्राधीकरण यांचेकडे वर्ग करणेत आलेले आहे. प्रकल्पांबाबतचा तपशील सोबत जोडला आहे.

| अ.क्र. | प्रकल्पांचे नाव | तज्ञ सल्लागाराचे नाव | तज्ञ सल्लागार नेमणूक दिनांक | प्रकल्पावर झालेला खर्च (कोटी) | प्रकल्पासाठी सल्लागाराला दिलेली फी (लाख) | प्रकल्पाची सद्यस्थिती | अपूर्ण कामे पूर्णत्वाची नियोजित तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | कात्रज स्वारगेट हडपसर या मार्गावरील पथदर्शी प्रकल्पाची कामे करणे. | आय.एल.ॲन्ड एफ.एस.दिल्ली | ३०/०३/२००७ | १२७.४८ | १९२.९१ | काम पूर्ण | - |
| २ | जे.एन.एन.यु. आर. एम. अंतर्गत झोपडपट्टी धारकांसाठी घरे बांधणे. (बी.एस.यु.पी.-वारजे, हडपसर)-ओटा मार्केट-इनसिटू | मे. ओंकार असोसिएट्स | २५/०४/२००७ | २६३.३० | ७७०.०० | काम पूर्ण | - |
| ३ | खडकी रेल्वे स्टेशन येथे पादचारी उड्डाणपूल बांधणे | मे.सी.व्ही.कांड कन्सल्टंट प्रा.लि. | २/११/२००७ | १.६९ | ७.१९ | काम पूर्ण | - |
| ४ | नदी सुधारणा ००३ | नाईक इनव्हार्यनमेंट रिसर्च लि. | २६/०३/२००८ | ९९.०० | ४५.०० | काम पूर्ण | - |
| ५ | नदी सुधारणा ००४ | नाईक इनव्हार्यनमेंट रिसर्च लि. | २६/०३/२००८ | ९९.०० | १४.३६ | काम पूर्ण | - |
| ६ | धनकवडी उड्डाणपूल | ५६ फ १ मे. सी.व्ही.कांड | ०५/०५/२००८ | ६२.९२ | २१६.७७ | काम पूर्ण | - |
| ७ | हडपसर गाडीतळ येथील | मे.एस.एन. भोबे ॲन्ड असो. प्रा.लि., पुणे. | ०५/०५/२००८ | ३०.०३ | ९९.३० | काम पूर्ण | - |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | उड्डाणपूल. | | | | | | |
| ८ | हडपसर हांडेवाडी ससाणेनगर रेल्वे भुयारी मार्ग. | मे.सी.व्ही.कांड कन्सल्टंट प्रा. लि. | ०५/०५/२००८ | २.८१ | ५२.४२ | प्रलंबित | भूसंपादन अभावी प्रलंबित |
| ९ | होळकर पूल ते चंद्रमाचौक रस्ता रुंदीकरण करणे व उड्डाणपूल बांधणे | मे.सी.व्ही.कांड कन्सल्टंट प्रा.लि. | ०५/०५/२००८ | ८.१७ | २५.०० | काम पूर्ण | - |
| १० | होळकर पूल बांधणेमे. टेक्नोजेम कन्सल्टंट प्रा.लि. | मे. टेक्नोजेम कन्सल्टंट प्रा.लि. | ०६/०५/२००८ | ६६.२० | २४८.३५ | काम पूर्ण | - |
| ११ | संचेती हॉस्पीटल जवळील रेल्वे कि.मी. १८९/११-१२ येथील रेल्वे उड्डाणपूल क्रमांक १८९/३ रुंदीकरण करणे | मे. विशाल निर्मिमी प्रा.लि. | १३/५/२००८ | १३.८१ | ७५.०० | काम पूर्ण | - |
| १२ | चंद्रमा चौक ते होळकर पूल या अॅप्रोच रस्त्याचे रुंदीकरण करणे व इतर विकसनाची कामे करणे. | मे.सी.व्ही.कांड कन्सल्टंट प्रा.लि. | २३/०९/२०१० | ७.२१ | २१.५५ | काम पूर्ण | - |
| १३ | बंडगार्डन नजिक नवीन पूलाचे बांधकाम करणे. | मे. कॅशेक इंजिनिअर्स प्रा.लि. | ०४/०४/२००७ | ३४.३५ | ६४.०० | काम पूर्ण | - |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १४ | सावरकर भवन येथे पार्किंग विकसीत करणे. | मे. नवगिरे आणि नवगिरे आर्किटेक्ट | १३/०७/२०११ | १.५३ | ३.५० | काम पूर्ण | - |
| १५ | मुंढवा स.नं. ८९ व ७१ दरम्यान पुणे सोलापूर रेल्वे लाईनवर २४.० मी.एच.सी.एम. टी. आर.साठी रेल्वे ओलांडणी पूल बांधणे. | मे. कॅशेक इंजिनिअर्स प्रा.लि. | २९/०९/२०१० | २०.४८ | ६२.५५ | काम चालू | जून २०१८ अखेर |
| १६ | साईबाबा मंदिर, सातारा रोड येथे पादचारी भुयारी मार्ग बांधणे. | मे.एस.एन.भोबे ॲण्ड असो. प्रा.लि. | २६/१०/२०१० | ३.३३ | ९.११ | काम पूर्ण | - |
| १७ | शिवाजीनगर कोर्टाजवळील भुयारी मार्ग. | मे.विश्वास कुलकर्णी | २६/१०/२०१० | २.६० | ५.६२ | काम पूर्ण | - |
| १८ | बिबेवाडी जंक्शन येथे पादचारी व वाहन भुयारी मार्ग बांधणे | मे.एस.एन.भोबे ॲण्ड असो. प्रा.लि. | १४/१२/२०१० | ६.६६ | ७.०० | काम पूर्ण | - |
| १९ | कोंढवा रोडवरील लुल्लानगर चौकात उड्डाणपूल बांधणे | मे. कॅशेक इंजिनिअर्स प्रा.लि. | २३/०२/२०११ | २.८३ | २३.३७ | काम चालू | मे २०१८ अखेर |
| २० | कमिन्स कॉलज जंक्शन, वारजे रोड येथे उड्डाणपूल बांधणे | मे.सी.व्ही.कांड कन्सल्टंट प्रा.लि. | १७/८/२०११ | २१.८४ | १०५.७८ | काम चालू | जानेवारी २०१८ अखेर |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | अ) अभियांत्रिकी महाविद्यालय चौक ते पाटील इस्टेट दरम्यान उड्डाणपूल बांधणे. (ब) उर्वरित कामे करणे. | मे. कॅशेक कन्सल्टंट | १७/८/२०११ | ९४.२७ | २१७.८२ | काम चालू | जानेवारी २०१८ अखेर |
| २२. | अलंकार टॉकीज येथे रेल्वे उड्डाणपूल बांधणे | मे. विशाल निर्मिमी प्रा.लि. | १९/१२/२०११ | ४.४४ | २५.१५ | .काम चालू | ऑगस्ट २०१८ अखेर |
| २३ | बालेवाडी स.नं.४७/४ येथे मुळा नदीवर पूल बांधणे | मे.एक्स.सी.सी. | १३/०८/२०१३ | १५.७५ | १३३.०२ | काम चालू | पिंपरी चिंचवड मनपा बाजूने एक स्पॅनचे काम भूसंपादना मुळे प्रलंबित आहे. जागा ताब्यात आल्यानंतर नव्याने निवीदा काढणेत येणार आहे. |
| २४ | नवा पूल ते मनपा भवन पादचारी पूल बांधणे | इंजिनिअर्स ॲन्ड प्लॅनर्स | १५/०८/२०१३ | ०.५० | १.५४ | काम पूर्ण | - |
| २५ | मुंढवा येथील मुळा मुठा नदीवर नवीन पूल बांधणे | मे. स्टूप कन्सल्टंट प्रा.लि. | १९०८/२०१३ | १४.८२ | ४३.६२ | काम चालू | फेब्रुवारी २०१८ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २६ | चांदणी चौक कोथरुड येथे उड्डाणपूल बांधणे | मे. एक्स.सी.सी. इंजिनिअर्स ॲन्ड प्लॅनर्स | १९/०८/२०१३ | - | २५.१० | राष्ट्रीय राजमार्ग प्राधीकरण यांचे कडे वर्ग | राष्ट्रीय राजमार्ग प्राधीकरण यांचेकडे वर्ग |
| २७ | राजा शिवराय प्रतिष्ठाण,पौड रोड येथील भुयारी मार्ग बांधणे | मे. प्रसाद आर्किटेक्ट ॲण्ड टाऊन प्लॅन्स | १३/१२/२०१३ | २.७७ | २.०० | काम पूर्ण | - |
| २८ | पुणे शहरातील एकात्मिक सायकल आराखडा तयार करणे | मे. इनोव्हेटिव्ह ट्रान्सपोर्ट सोल्युशन | ०३/१२/२०१५ | - | ६३.२५ | काम पूर्ण | - |
| २९ | मुळा-मुठा नदीकाठ विकसनासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे. | मे.एच.सी.पी.डिझाईन प्लॅनिंग ॲन्ड मॅनेजमेंट प्रा.लि. | ३०/०१/२०१६ | - | १८३.८२ | काम चालू | मे २०१८ |
| ३० | मुळा नदीवरील शिवाजीनगर येथील डेंगळे पूलाची दुरुस्ती करणे व जुन्या पुलालगत नवीन पूल बांधणे | मे. एक्स.सी.सी. इंजिनिअर्स ॲन्ड प्लॅनर्स | ०२/०६/२०१६ | ४.१७ | २२.०० | काम चालू | डिसेंबर २०१८ (अपूर्ण तरतुदीमुळे) |
| | | | | १०११.९६ कोटी | २७६६.१० लाख | | |

---

**मुंबई उपनगरातील गटारे उघडी असल्याने मोठया प्रमाणात नागरिकांचे मृत्यू झाल्याबाबत**

**(१०) ९९६७६ (०३-०१-२०१८). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम**

**शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील गटारे उघडी असल्याने माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या पावसात गटारात पडून मोठया प्रमाणात नागरिकांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एल्फिन्स्टन येथे डॉ.दीपक अमरापुरकर यांचाही मॅनहोलमध्ये पडून मृत्यू झाल्याचे दिनांक १ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दुर्घटनेनंतर घटीत करण्यात आलेल्या चौकशी समितीने मॅनहोलच्या आत सुरक्षाजाळी बसविण्याची शिफारस केली असतानाही जल अभियंता विभागाचे अधिकारी याबाबत गंभीर नसल्याचे दिसून येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील मॅनहोल्सच्या आत सुरक्षा जाळी लवकरात लवकर बसविण्याबाबत तसेच माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान गटारात पडून मृत्यु झालेल्या मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत व संबंधित जबाबदार महानगरपालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांवर दंडात्मक वा प्रशासकीय कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१) दिनांक २९.०८.२०१७ रोजी मुंबई शहर व उपनगरात झालेल्या अतिवृष्टीमुळे घडलेल्या विविध घटनांमध्ये ११ नागरिकांचा मृत्यू झाला ही वस्तुस्थिती आहे.

(२) बॉम्बे हॉस्पिटलचे डॉ. दिपक अमरापूरकर यांचा दिनांक २९.०८.२०१७ रोजी एल्फिस्टन येथे मॅनहोलमध्ये पडून मृत्यू झाला होता.

(३) व (४) सदर दुर्घटनेनंतर गठीत करण्यात आलेल्या चौकशी समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने, महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त इतर इसमांकडून हेतुपुरस्सर उघडण्यात येणाऱ्या मॅनहोलवरील झाकणामुळे अपघात होऊ नये याकरिता मुंबई शहर विभागातील पूर प्रवण ठिकाणांच्या पर्जन्य जलवाहिन्यांच्या मॅनहोलमध्ये सुरक्षा जाळया बसविण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या नुकसानग्रस्तांना खालीलप्रकारे मदत देण्यात आली आहे :-

• मुंबई उपनगरातील ४ मृत व्यक्तींच्या वारसास प्रत्येकी रु. ४ लाख इतके आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे.

• इतर २ मृत व्यक्तींच्या वारसांना, वारस तपासणीनंतर प्रत्येकी ४ लाख इतके आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

• उर्वरित ३ मृत व्यक्तींच्या प्रकरणी चौकशी करुन पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेमार्फत करण्यात येत आहे.

• मुंबई शहरातील श्री. शमशम खान यांच्या वारसांना रु. ४ लाख इतके आर्थिक सहाय्य देण्यात आले आहे.

• डॉ. दिपक अमरापूरकर यांच्या वारसांनी कागदपत्रांची पूर्तता न केल्याने रु. ४ लाख इतके आर्थिक सहाय्य देता आले नाही.

• घरांची पडझड झालेल्या एकूण ४६ पात्र कुटुंबांना प्रत्येकी रु. ३८००/- इतके सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाने मुंबई महानगरपालिकेत मुख्य लेखा परिक्षक या पदावर प्रतिनियुक्तीवर पाठविलेल्या अधिकाऱ्याने अधिकाराचा केलेला गैरवापर**

**(११) १००१७९ (१२-०२-२०१८). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने वर्षभरापूर्वी मुंबई महानगरपालिकेत मुख्य लेखा परिक्षक या पदावर प्रतिनियुक्तीवर पाठविलेल्या अधिकाऱ्याने स्वत:च्या अधिकाराचा गैरवापर केल्याने त्यांना दिनांक ३ जुलैपासून परत शासनाच्या सेवेत पाठविण्यात आल्याची बाब माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या अधिकाऱ्याने स्वत:चे अधिकाराचा गैरवापर करुन कार्यालयीन शिस्तीचा व गोपनीयतेचा भंग केल्याने त्यांना परत शासनाच्या सेवेत पाठविण्यात येत असल्याबाबतचे निवेदन अतिरिक्त आयुक्त यांनी स्थायी समितीत केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारे कार्यालयीन शिस्तीचा व गोपनीयतेचा भंग करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१) याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. तथापि, मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक २६.०७.२०१७ रोजीच्या आदेशानुसार आणि महानगरपालिकेच्या दिनांक १८.०१.२०१८ रोजीच्या ठरावानुसार श्री. सुरेश बनसोडे यांची महानगरपालिका मुख्य लेखा परिक्षक या पदावरील नेमणुक पुढे सुरु ठेवण्यात आली.

(२) हे खरे आहे.

(३) सदर मुख्य लेखा परिक्षक यांच्याबाबत सकृतदर्शनी निदर्शनास आलेल्या गैरवर्तणूकीबाबत वित्त विभागास कळविण्यात आले असून, पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात नव्याने स्थापन झालेल्या नगरपरीषदांमधे तत्कालीन ग्रामपंचायातीच्या सर्व कर्मचाऱ्यांचा समावेश करण्याबाबत**

**(१२) १००३८३ (०१-०१-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नव्याने स्थापन झालेल्या नगरपरीषदांमधे तत्कालीन ग्रामपंचायातीच्या सर्व कर्मचाऱ्यांचा समावेश न करता सरळ सेवेने भरतीच्या निकषानुसार समावेशनाचे आदेश काढल्याने तसेच नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात मंत्रालयात दिनांक १६ ऑगस्ट, २०१७ ते २४ ऑगस्ट, २०१७ वा त्या दरम्यान झालेल्या चर्चेनुसार अद्याप कुठलाच निर्णय न झाल्याने नगरपरिषद कर्मचारी समन्वय समिती महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिनांक ०८ ऑक्टोबर, २०१७ रोजी आळंदी येथे मेळावा आयोजित करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवनिर्मित नगरपरिषदांमधे तत्कालीन ग्रामपंचायत मध्ये कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांचे समावेशन करण्यासंदर्भात लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री तसेच राज्यमंत्री, नगरविकास यांचेकडे पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवनिर्मित चाकण नगरपरिषदच्या मंजूर आकृतीबंधानुसार सर्व तत्कालीन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे समावेशन न झाल्याने मा.मुख्याधिकारी यांनी दिनांक २४ जुलै, २०१७ च्या पत्रानुसार मा.प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त, पुणे यांचेकडे मागणी प्रस्ताव तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने शासन स्तरावरून कोणती निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१८) :** (१) असा मेळावा आयोजित करण्यात आल्याचे शासनास ज्ञात नाही.
(२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधींचे दि.२४.१०.२०१७ रोजीचे पत्र आढळून आले नाही. तथापि, तत्कालीन ग्रामपंचायत चाकण येथील कर्मचाऱ्यांचे चाकण नगरपरिषदेमध्ये समावेशन करण्याचे विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयाकडून दि.२३.०६.२०१७ रोजी आदेश पारित केले आहेत.

तसेच, नवनिर्मित नगरपंचायत/ नगरपरिषदांमध्ये तत्कालीन ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांचे समावेशनासाठी विहित अटी व कार्यपध्दतीमध्ये दि.३०.११.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारणा केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथे बंद असलेल्या सार्वजनिक शौचालयावर अतिक्रमण केल्याबाबत**

**(१३) १०१६३० (०३-०१-२०१८). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील बॅरेक क्रमांक १२९१-९२ च्या मागे श्री.धावरे यांनी सार्वजनिक बंद शौचालयावर अतिक्रमण करुन त्याचे बाजूस खोली बांधल्याने स्थानिकांना येण्या-जाण्यासाठी मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असून येथील स्थानिक रहिवाशी व लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, ठाणे, आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका तसेच वॉर्ड अधिकारी यांना निवेदने दिल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत बांधकाम महानगरपालिकेने वारंवार निष्कासित करुनही श्री.धावारे व त्यांचे कुटुंबिय परत तेथेच झोपडी उभारत असून त्यास हरकत घेतल्यास नागरिकांना धमकावत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन श्री.धावरे यांच्यावर फौजदारी कारवाई करुन उक्त अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याच्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

• सदर झोपडी दिनांक २९.०३.२०१६ रोजी पोलीस बंदोबस्तात निष्कासित करण्यात आली होती.

• सदर ठिकाणी पुन्हा अनधिकृत बांधकाम करण्यात आल्यामुळे संबंधितांवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५२,५३,५४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नरखेड (जि.नागपूर) नगरपरिषद येथे सन २००७ मध्ये IHSDP टप्पा-१ अंतर्गत ६८० घरकुलांची योजना राबविण्यात आल्याबाबत**

**(१४) १०२२९८ (०६-०१-२०१८). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरखेड (जि.नागपूर) नगरपरिषद येथे सन २००७ मध्ये केंद्र शासनाची IHSDP टप्पा-१ अंतर्गत ६८० घरकुलांचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे निदर्शनास आल्यावर तत्कालीन मुख्यमंत्री यांनी सन २०११ मध्ये सदर प्रकरणात सुकाणु समिती गठित करून चौकशीचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीद्वारे अद्यापपर्यंत कुठल्याही प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी जिल्हाधिकारी, नागपूर यांनी प्रशासकीय अनियमिततेबाबतची उपविभागीय अधिकारी, काटोल व तांत्रिक तपासणीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर व म्हाडा नागपूरद्वारे संयुक्तरितीने चौकशी केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपविभागीय अधिकारी, काटोल यांच्या अहवालामध्ये ब-याच प्रमाणात हेतुपरसस्पर अनियमितता झाल्याचे तसेच म्हाडा, नागपूरच्या रिपोर्टमध्ये अनियमितता दर्शविण्यात आलेली असून घरकुल दुरुस्ती व पाहणीकरीता एकूण रुपये ३,६७,२९,७४६/- प्रति घरकुल रुपये ६५९५५.७८/ एवढा खर्च दर्शविण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नगरपरिषद नरखेडकडे IHSDP टप्पा १, २, ३, अंतर्गत रुपये १४,४४,७१,५८६/- इतके रुपये शिल्लक असून सदर रक्कमेतून लाभार्थ्यांना त्यांचे घरकुल दुरस्तीकरीता परवानगी मिळवून देण्यात यावी जेणेकरून ६८० लाभार्थ्यांना न्याय मिळेल तसेच सदर प्रकरणात दोषी असलेल्या तत्कालीन नगराध्यक्ष, नगरपरिषद सदस्य, मुख्याधिकारी व संबंधित तांत्रिक अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करून लाभार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) • नरखेड नगरपरिषदेने केंद्रशासन पुरस्कृत एकात्मिक झोपडपट्टी व विकास कार्यक्रमांतर्गत पहिल्या टप्प्यात ४४४ घरकुलांचे बांधकाम केले आहे.

• सदर काम डीपीआर नुसार झाले नसल्याचे तसेच योग्य त्या दर्जाचे झाले नसल्याचे आढळून आल्याने या कामाची उपविभागीय अधिकारी, काटोल, म्हाडा नागपूर व सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

• चौकशीमध्ये आढळून आलेल्या अनियमिततांबाबतचे ठराव मंजूर करणा-या तत्कालिन अध्यक्ष व नगरसेवकांना १९६५ च्या अधिनियमातील कलम ४२ व ५५ नुसार अपात्र का ठरविण्यात येऊ नये ? याबाबतच्या कारणे दाखवा नोटीसा देण्यात आल्या आहेत. पैकी कार्यरत असलेल्या ५ नगरसेवकांना दि.२९.११.२०१६ च्या आदेशान्वये अनर्ह ठरविण्यात आले आहे.

• अनियमिततांना जबाबदार तत्कालिन मुख्याधिकारी व नगरपरिषदेचे अन्य अधिकारी यांची जबाबदारी निश्चित करुन त्यांच्याविरुध्दच्या दोषारोपाची प्रारुपे पाठविण्यास जिल्हाधिकारी, नागपूर यांना कळविण्यात आले आहे.

• बांधण्यात आलेल्या ४३१ घरकुलांच्या दुरुस्ती व सुधारणेसाठी प्रति घरकुल रु. ६५९५६ एवढा खर्च अपेक्षित असल्याची बाब अहवालात नमूद करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत शिल्लक रक्कमेतून सदर खर्च करण्यास मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या गृहनिर्माण विभागास सादर करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिका हद्दीतील घरांच्या दुरुस्तीची परवानगी ऑनलाईन देण्याच्या प्रस्तावाबाबत

**(१५) १०३३४३ (१२-०२-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका हद्दीतील घरांच्या दुरुस्तीची परवानगी ऑनलाईन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे,

(४) असल्यास, सदर प्रस्तावाची अमंलबजावणी किती कालावधीत होणे अपेक्षित आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१) मुंबई महानगरपालिका हद्दीतील घरांच्या दुरुस्तीच्या प्राप्त प्रस्तावांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३४२ अन्वये ऑनलाईन प्रणालीमार्फत परवानगी देण्यात येते.

(२), (३) व (४) विकास नियंत्रण नियमावली १९९१ अन्वये आवश्यक असणारी कागदपत्रे व मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३४२ अन्वये नोटीस जोडून वास्तुविशारद किंवा अनुज्ञापन सर्वेक्षक यांच्यामार्फत ऑडिटर प्रणालीमध्ये घरदुरुस्तीचा प्रस्ताव ऑनलाईन सादर करता येतो.

सदर प्रस्ताव विकास नियंत्रण नियमावलीस अनुसरुन असल्यास गुणवत्तेप्रमाण त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येते व सदर प्रस्ताव मंजूर किंवा नामंजूर करण्यात येतो.

---

## मुंबईतील मल:निसारण वाहिनीच्या सफाईसाठी खरेदी करण्यात आलेल्या सात सक्शन मशिनबाबत

**(१६) १०५२५३ (१४-०४-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमधील मल:निसारण वाहिन्यांची सफाई करण्यासाठी दोन कंपन्यांकडून सुमारे पावणे दोन कोटी खर्च करून वाहनांवर बसविण्यात आलेल्या सात सक्शन मशीन खरेदी करण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मशीनसच्या देखभालीसाठी पुढील आठ वर्ष अंदाजे ४० कोटी रुपये खर्च करण्यात येणार असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारे कमी किंमतीत खरेदी केलेल्या मशीन्सच्या देखभालीवर दामदुपटीने खर्च करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८)** : (१) मुंबईतील मलनि:सारण वाहिन्यांची सफाई करण्यासाठी, मुंबई शहराकरीता ४ व पूर्व उपनगराकरीता ३ अशा रु. १.७२ कोटी किंमतीच्या एकूण ७ सक्शन मशिनची खरेदी ई-निविदा प्रक्रियेद्वारे करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये कार्यादेश देण्यात आले आहेत.

(२), (३) व (४) सदर ७ मशीनच्या प्रचालन व सर्वसमावेक्षक परिरक्षणाकरीता पुढील ८ वर्षामध्ये रु. ३२ कोटी इतका खर्च येणार असून यामध्ये, यंत्राच्या प्रचलनाकरीता लागणाऱ्या कर्मचारी वर्गाचा वेतन खर्च, डिझेलचा खर्च, यंत्राच्या दुरुस्ती करीता लागणाऱ्या सुट्टया भागाचा खर्च तसेच इतर साहित्य व उपकरणे आणि सुरक्षततेची साधने, इत्यादींकरीता लागणाऱ्या खर्चाचा अंतर्भाव आहे.

---

### भिवंडी महानगरपालिका आयुक्त यांनी बेकायदेशीररित्या दिलेली पदोन्नती

**(१७) १०५८७० (१८-०४-२०१८). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी महानगरपालिका आयुक्त यांनी दिनांक ३ जून, २०१६ रोजी बेकायदेशीर पदोन्नती दिलेल्या सर्व अधिकाऱ्यांविरुध्द तातडीने कारवाई करण्यात यावी असा लेखी आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिल्याची बाब दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन महानगरपालिका आयुक्त श्री.शिवमुर्ती नाईक व श्री.अच्युत हांगे यांनी बेकायदेशीरपणे ज्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना पदोन्नती दिल्याचे चौकशीत निदर्शनास आले, अशी पदोन्नती बेकायदेशीरपणे देणाऱ्या तत्कालीन महानगरपालिका आयुक्त यांचेविरोधात कोणतीही कारवाई शासनाने न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, लोकायुक्त व नगरविकास विभागाने त्यांच्याकडे आलेल्या विविध तक्रारीनुसार तसेच महानगरपालिका आयुक्त योगेश म्हसे यांनी केलेल्या चौकशीत ज्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना बेकायदेशीर पदोन्नती मिळाली होती अशा सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांविरोधात कारवाई न करता काही ठराविक अधिकारी व कर्मचारी यांचेविरोधात कारवाई करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ज्या कर्मचारी व अधिकाऱ्यांची पदोन्नती बेकायदेशीरपणे करण्यात आली होती, त्या सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांना पदोन्नतीनंतर शासकीय नियमाप्रमाणे मिळालेला आर्थिक लाभ बेकायदेशीर ठरला असून त्याची वसुली शासन तातडीने करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका व शासनाने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेत झालेल्या पदोन्नतीच्या अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे: -

- उपरोक्त विषयांकित प्रकरणी मा.उप लोक आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशान्वये विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना चौकशी अधिकारी म्हणुन प्राधिकृत करण्यात आले होते.
- तद्नुषंगाने विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी दिनांक २७.०३.२०१५ अन्वये चौकशी अहवाल शासनास सादर केला होता.
- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेत झालेल्या पदोन्नतीच्या अनियमिततेबाबत कार्यवाही करण्याबाबत विभागाने दिनांक २४.१०.२०१६ रोजी पत्र निर्गमित केले आहे.
- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांनी दिनांक ३०.११.२०१६ रोजी संबधित अधिकारी / कर्मचाऱ्यांना निलंबित करुन त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरू केली.
- संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी पदावनत न करण्याबाबत मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.
- मा.उच्च न्यायालयाने सदर अधिकारी कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणने मांडण्याचे निर्देश भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेस दिले.
- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने संबधित अधिकारी / कर्मचारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावून सुनावणी घेतली आहे.
- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने सदर सुनावणी अंती २१ अधिकारी / कर्मचारी यांना पदावनत केले आहे. तसेच त्यांना पदोन्नतीनंतर मिळालेला आर्थिक लाभ वसुल करण्याची महानगरपालिका स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील स्मशानभूमीच्या सुरक्षिततेबाबत**

**(१८) १०५८७९ (१२-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिका क्षेत्राचे झपाटयाने नागरिकीकरण होत असल्याने येथे सध्या अस्तित्वात असलेल्या स्मशानभूमीच्या सुरक्षिततेबाबत गंभीर समस्या निर्माण झाली असून याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यासंदर्भात माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान महापालिका आयुक्त तसेच कोकण विभाग आयुक्त यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार या स्मशानभूमीची पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, या स्मशानभूमीच्या सुरक्षिततेबाबत तसेच अन्य सोयी-सुविधा पुरविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१), (२) व (३) होय.

पनवेल महानगरपालिकेच्या क्षेत्रातील स्मशानभूमी सुरक्षिततेबाबत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

- पनवेल महानगरपालिकेच्या (पूर्वाश्रमीच्या नगरपरिषद हद्दीतील) स्मशानभूमी येथे सुरक्षिततेबाबत ठेकेदारामार्फत कर्मचाऱ्यांची व्यवस्था केलेली आहे.
- स्वच्छता व विद्युत व्यवस्था ठेवण्यात येते.
- सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातून सी.सी. टीव्ही व अनुषंगीक उपाययोजना करण्यात येणार आहे.
- जळीताच्या नोंदी घेण्याकरिता स्वच्छता निरीक्षकांना जबाबदारी देण्यात आली आहे.
- स्मशानभूमीची निगा, दुरूस्तीदेखभाल करण्याकामी स्थळ पाहणी करुन अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई शहरातील ५० मराठी शाळांसह एकूण ६३ खाजगी विनाअनुदानित शाळांना अनुदान मिळणार नसल्याबाबत

**(१९) १०६०५३ (१८-०४-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.राहूल पाटील (परभणी), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राथमिक शिक्षण ही महापालिकेची जबाबदारी असतांना मुंबई शहरातील ५० मराठी शाळांसह एकूण ६३ खाजगी विनाअनुदानित शाळांना अनुदान मिळणार नसल्याचे पालिका प्रशासनाने माहे जानेवारी, २०१८ च्या सुमारास लिखित स्वरुपात देण्यात आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी शाळांना उर्जितावस्था आणण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राथमिक शिक्षणासाठी शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ०३.०३.१९७६ व दिनांक १७.१२.१९९४ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% इतकी रक्कम अनुज्ञेय आहे.

त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेस शालेय शिक्षण विभागाकडून सन २०१६-१७ पर्यंत चौथ्या वेतन आयोगानुसार वेतन अनुदान प्राप्त होत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने शालेय शिक्षण विभागाकडे प्राथमिक शिक्षणासाठी सन २००५ पर्यंत पाचव्या व सन २००६ नंतर सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन अनुदानाची मागणी सादर केली आहे.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पाचव्या व सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी लागू करण्याबाबत निर्णय झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल असे शालेय शिक्षण विभागाकडून कळविण्यात आले आहे.

---

**मुंबई शहरातील "गेटवे ऑफ इंडिया" चे "भारतद्वार" असे नामकरण करण्याबाबत**

**(२०) १०६०८९ (१८-०४-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील "गेटवे ऑफ इंडिया" हे इंग्रजी राजवटीचे व गुलामगिरीचे प्रतिक असून ते बदलून "भारतद्वार" असे नामकरण करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे लोकप्रतिनिधीनी दिनांक १४ जुन, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरूप काय आहे व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील रस्ते, पुल, चौक, उद्याने याबाबत महानगरपालिकेच्या धोरणानुसार नामकरण करण्यात येते.

तथापि, गेट वे ऑफ इंडिया ही वास्तु केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहर व उपनगरामध्ये महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सन २०१६-१७ मध्ये इयत्ता ५ वी व ८ वी मधील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये घट झाल्याबाबत**

**(२१) १०६४३५ (१२-०४-२०१८). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरामध्ये महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सन २०१६-१७ मध्ये इयत्ता ५ वी व ८ वी मधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या इयत्ता ५ वी मधील शिष्यवृत्ती मिळणा-या विद्यार्थ्यांची संख्या १.६ टक्के इतकी असून शिष्यवृत्ती मिळणा-या खाजगी शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या ११.०८ टक्के इतकी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महनगरपालिकेच्या इयत्ता ८ वी मध्ये शिष्यवृत्ती मिळणा-या विद्यार्थ्यांची संख्या ०.६ टक्के इतकी असून शिष्यवृत्ती मिळणा-या खाजगी शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या १०.९ टक्के इतकी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिष्यवृत्तीत घट होण्याची कारणे काय आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) शिष्यवृत्ती परीक्षा ही ऐच्छिक परीक्षा असून, सदर परीक्षेत सहभाग घेणे हे पूर्णत: पालकांच्या इच्छेवर अवलंबून आहे.

त्यामुळे सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंदगड, शिरोळ, हातकणंगले, भुदरगड व शाहुवाडी (जि.कोल्हापूर) येथील मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या ग्रामपंचायतींना नगरपंचायतीचा दर्जा देण्याबाबत**

**(२२) १०७२०३ (१४-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने सन २०१४ मध्ये काढलेल्या आदेशानुसार राज्यातील तालुक्याच्या मुख्यालयी असलेल्या ग्रामपंचायतींना नगरपंचायतीचा दर्जा देण्याबाबत कोल्हापूर जिल्हयातील चंदगड, शिरोळ, हातकणंगले, भुदरगड व शाहुवाडी येथील मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या ग्रामपंचायतींना नगरपंचायतीचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावाच्या संदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०६-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे,
• तालुका मुख्यालये असलेल्या ग्रामपंचायतींचे नगरपंचायत / नगरपरिषदेत रुपांतर करण्याचा शासनाने सन २०१४ मध्ये निर्णय घेतला होता.
• सदर निर्णयानुसार या प्रक्रियेचा पहिला टप्पा म्हणून राज्यातील १३६ ग्रामपंचायतींचे नगरपंचायत / नगरपरिषदेत रुपांतर करण्याच्या प्राथमिक अधिसूचना शासनाने निर्गमित केल्या व त्यावर संबंधिताचे आक्षेप मागविण्यात आले. या १३६ ग्रामपंचायतीत चंदगड, शिरोळ, हातकणंगले, भूदरगड व शाहूवाडी ग्रामपंचायतींचा समावेश होता.
• प्राप्त झालेले आक्षेप विचारात घेऊन ग्रामविकास विभागाच्या सहमतीने वरील १३६ ग्रामपंचायतीपैकी १२३ ग्रामपंचायतीच्या नगरपंचायत/नगरपरिषदेत रुपांतर करण्याच्या अंतिम अधिसूचना शासनाने निर्गमित केल्या आहेत. त्यात शिरोळ ग्रामपंचायतीचा समावेश असून दि.०३.०२.२०१८ रोजी शिरोळ नगरपरिषद अस्तित्वात आली आहे.

• प्राथमिक अधिसूचना निर्गमित झालेल्या तथापि, अद्याप अंतिम अधिसूचना निर्गमित न झालेल्या १३ ग्रामपंचायती असून त्यात चंदगड, हातकणंगले, भूदरगड व शाहुवाडी ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

• नव्याने निर्माण करण्यात आलेल्या १२३ नगरपंचायती / नगरपरिषदा स्थापन करण्यात आल्यानंतर त्यांच्या क्षेत्रातील नागरिकांना कार्यक्षम, लोकाभिमुख व प्रभावी प्रशासन उपलब्ध होण्याच्या दृष्टीने लाभ झाला व कसे याचे मुल्यमापन करण्यात येत आहे.

• सदर मुल्यमापनानंतर मंत्रीमंडळाच्या दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ च्या बैठकीनुसार स्थापन करण्यात आलेल्या मंत्रीमंडळ-उपसमितीसमोर चंदगड, हातकणंगले, भूदरगड व शाहुवाडी यांचे प्रस्ताव विचारार्थ ठेवून योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील धारावी परिसरातील अभ्युदय बँकेपासून माहिम फाटकापर्यंत उभारण्यात आलेला स्कायवॉक माहिम रेल्वे स्थानकाला जोडण्याबाबत

**(२३) १०७९०७ (१२-०४-२०१८). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडाने मध्य मुंबईतील धारावी परिसरातील अभ्युदय बँकेपासून माहिम फाटकापर्यंत उभारण्यात आलेला स्कायवॉक माहिम रेल्वे स्टेशनला जोडण्यात आलेला नसल्यामुळे रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या नागरीकांची गैरसोय होत असल्याने सदरहू स्कायवॉक पुढे माहिम रेल्वे स्टेशनला जोडण्यात यावा अशी मागणी मागील ३ वर्षापासून तेथील नागरिकांनी मा.गृहनिर्माणमंत्री, मा.मुख्यमंत्री आदींकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला व घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२७-०८-२०१८) :** (१) व (२) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांचेकडून प्राप्त अहवालानुसार धारावी मुंबई-१७ या विधानसभा मतदार संघातील माहिम रेल्वे स्थानक ते धारावी सेक्टर-३ येथील अभ्युदय बँकेपर्यंत स्कायवॉक बांधण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून रु.१४.१२ कोटी इतका निधी म्हाडास उपलब्ध करुन देण्यात आला होता. प्रकल्पाच्या सर्वेक्षणानुसार सदर स्कायवॉकचे काम योग्य ती उपयुक्तता होण्यासाठी एकुण रु.३४ कोटी इतक्या निधीची आवश्यकता होती. सदर स्कायवॉकचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार दोन टप्प्यात करणे क्रमप्राप्त होते. त्यानुसार स्कायवॉक टप्पा १ मध्ये प्राप्त निधी रु.१४.१२ कोटी मधून २९४ मि. लांबीच्या स्कायवॉकचे काम पुर्ण करण्यात आले असून, सदर स्कायवॉक बृहनमुंबई महानगरपालिका यांचेकडे हस्तांतरीत करण्याची कार्यवाही म्हाडा प्राधिकरणाकडे सुरु आहे.

धारावी मुंबई-१७ या विधानसभा मतदार संघातील माहिम रेल्वे स्थानक ते धारावी सेक्टर-३ येथील अभ्युदय बँकेपर्यंत स्कायवॉक टप्पा-२ च्या कामामध्ये माहिम रेल्वे

स्थानकातील रेल्वेच्या पदचारी पुलास जोडणे, रेल्वेवरील पुर्व पश्चिम दिशेला जोडणारा महानगरपालिकेचा पदचारी पूल जोडणे इत्यादी कामाचा समावेश आहे. स्कायवॉक टप्पा-२ करिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने दि.२१.१२.२०१७ रोजी म्हाडा रु.१५,००,२६,२१५/- इतक्या निधीस मंजूरी दिली आहे. त्यानुसार स्कायवॉक टप्पा-२ च्या कामास निवीदा कार्यवाही प्रगतीपथावर आहे. धारावी मुंबई-१७ या विधानसभा मतदार संघातील माहिम रेल्वे स्थानक ते धारावी सेक्टर-३ येथील अभ्युदय बँकेपर्यंत स्कायवॉक टप्पा-२ च्या कामामध्ये सद्यस्थितीत टप्पा-१ मध्ये बांधलेला स्कायवॉक माहिम रेल्वेस्थानकाला जोडण्याचे काम अंतर्भूत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूरच्या सम्राट चौकातील सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन खात्याच्या बसगाड्यांच्या डेपोला आग लागून ७ गाड्या जळून खाक झाल्याबाबत

**(२४) १०७९५४ (१८-०४-२०१८). श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूरच्या सम्राट चौकातील सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन खात्याच्या बसगाड्या ठेवलेल्या डेपोला दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी रात्री अचानकपणे आग लागल्याने ७ गाड्या जळून खाक झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) यासंदर्भात दि.०१.०१.२०१८ रोजी सुरक्षा रक्षक म्हणून सेवेत असलेले श्री.श्रीकांत सातपुते यांना कर्तव्यात कसूर केल्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तसेच त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात येत आहे.

दि.०१.०१.२०१८ रोजी अज्ञात व्यक्ती विरुध्द जोडभावी पेठ पोलीस स्टेशन येथे एफ.आय.आर अन्वये गुन्हा दाखल केला आहे. त्यानुषंगाने या प्रकरणी पोलीस तपास सुरु आहे.

---

## चांदुर रेल्वे व नांदगाव खंडेश्वर शहरातील (जि.अमरावती) पाणी टंचाई निवारणार्थ बैठक घेणेबाबत

**(२५) १०८७४७ (१२-०४-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदुर रेल्वे व नांदगाव खंडेश्वर शहरातील (जि.अमरावती) पाणी टंचाई निवारणार्थ आवश्यक उपाययोजना व मंजुरी व कामे करणेसंबंधी बैठक घेणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्रान्वये जिल्हाधिकारी, अमरावती यांना लेखी कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सन्माननीय लोकप्रतिनिधींच्या विनंतीनुसार जिल्हाधिकारी यांनी दि.१६.०२.२०१८ रोजी बैठक बोलावली होती. सदर बैठकीस सन्माननीय लोकप्रतिनीधी व संबंधित अधिकारी उपस्थित होते. यात चर्चा होऊन भविष्यकालीन उपाययोजना निश्चित करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या परिक्षेत्रातील आरोग्य सेविकांच्या समस्यांबाबत

**(२६) १०८८६० (१८-०४-२०१८). कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या परिक्षेत्रात एकूण ४ हजार आरोग्य सेविकांच्या समस्यांवर प्रशासनाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही केली जात नसल्याची बाब दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आरोग्य सेविकांच्या समस्या सोडविण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत एकूण ३७०० आरोग्य सेविका कार्यरत असून, महापालिका आरोग्य सेवा कर्मचारी संघटना, मुंबई यांनी दिनांक २९.०६.२०१७ रोजी महिला आरोग्य सेविकांच्या किमान वेतनाबाबतची प्रकरणे मा. उच्च न्यायालय/कामगार न्यायालय/औद्योगिक न्यायालयात प्रलंबित असल्याबाबत लेखी निवेदन सादर केल्याचे कामगार आयुक्त यांनी कळविले आहे.
• किमान वेतन अधिनियम, १९४८ च्या कलम २० अन्वये आरोग्य सेविकांना किमान वेतन मिळत नसल्याप्रकरणी कामगार आयुक्त यांचेकडे २२१८ आरोग्य सेविकांचे १७ दावे वसुलीसाठी दाखल करण्यात आले आहेत. सदर प्रकरणी वसुली अधिकारी यांचेसमोर सुनावणी सुरु आहे.
• विविध आरोग्य केंद्रातील आरोग्य सेविकांच्या वतीने किमान वेतन तसेच घरभाडे भत्ता व प्रसुती लाभ मिळण्यासाठी संयुक्त तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.

• त्यानुसार संबंधित क्षेत्रीय कामगार अधिकारी यांच्यामार्फत व्यवस्थापनास कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**ठाण्यातील हरिनिवास सर्कल भागातील गिरीराज हाईट्स या २६ मजली इमारतीला लागलेल्या आगीबाबत**

**(२७) १०९०६२ (१२-०४-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यातील हरिनिवास सर्कल भागातील गिरीराज हाईट्स या २६ मजली इमारतीला आग लागली असता अग्निशमन दलाच्या पथकाने आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने १५० रहिवाशांना सुखरुप बाहेर काढल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अग्निशमन दलाच्या गाडीला निमुळत्या रस्त्यामुळे इमारतीच्या तळापर्यंत जाणेदेखील कठिण झाले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सतत लागणाऱ्या आगीला आणि त्यामध्ये होणाऱ्या जिवीतहानीबाबत शासन कोणत्या उपाययोजना करणार वा करित आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१), (२) व (३) • दिनांक १९.०१.२०१८ रोजी गिरीराज हाईटच्या चौथ्या मजल्यावरील इलेक्ट्रीक डक्टमध्ये शार्टसर्कीटमुळे आग लागली ही वस्तुस्थिती आहे.

• अग्निशमन दलाने तातडीने कार्यवाही करुन सदर आग एका तासाच्या आत विझवली तसेच सर्व रहिवाशांना सुरक्षित बाहेर काढले.

• यामध्ये कोणतीही जिवीत हानी झालेली नाही. तसेच कोणीही जखमी झालेले नाही. इलेक्ट्रीक डक्ट व्यतिरीक्त इतर कोणतीही वित्तीय हानी झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालाड (प) येथील मालवणी गेट क्रमांक ८ येथील महानगरपालिका शाळेची दुरवस्था झाली असल्याबाबत**

**(२८) १०९५४५ (१८-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या अनेक शाळांची दुरवस्था झाली असुन मालाड (प) येथील मालवणी गेट क्रमांक ८ येथील महानगरपालिका शाळेच्या इमारतीच्या छतावरील प्लॅस्टर कोसळत असल्याने विद्यार्थांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही शाळा महानगरपालिकेच्या 'पी' उत्तर विभागात येत असून येथे उर्दु, इंग्रजी, तमिळ, गुजराती माध्यमाच्या दोन मजली शाळेत सुमारे ३ हजार विद्यार्थी शिकत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळेच्या इमारतीची दुरवस्था झाल्यामुळे येथील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि सुमारे ३ हजार विद्यार्थी यांचे जीव धोक्यात आले आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१) मालाड (पश्चिम) येथील मालवणी गेट क्रमांक ८ येथील महानगरपालिका शाळेची दुरावस्था झाली हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर शाळेच्या इमारतीची दुरवस्था झाल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आल्यावर, सदर शाळेचे त्वरीत संरचनात्मक परिक्षण करुन घेण्यात आले व परिक्षण अहवालानुसार तात्काळ विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना नजीकच्या महानगरपालिका शाळेत स्थलांतरीत करण्यात आले.

(४) व (५) दिनांक ३१.०३.२०१८ रोजी दुरवस्था झालेल्या शाळेचे निष्कासन करण्यात आले असून, सदर जागी नवीन शालेय इमारत बांधण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रस्तावित करण्यात आले आहे.

---

### पनवेल (जि.रायगड) शहरात अनधिकृत मोबाईल टॉवर्सची संख्या वाढत असल्याबाबत

**(२९) १०९८२४ (१२-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) शहरात अनधिकृत मोबाईल टॉवर्सच्या संख्येत वाढ झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे महानगरपालिकेचा मोठया प्रमाणात मालमत्ता कर बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने अनधिकृत मोबाईल टॉवर्सबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८)** : (१), (२) व (३) • पनवेल महानगरपालिकेची स्थापना दिनांक ०१.१०.२०१६ रोजी झाली आहे. पुर्वीपासून सिडको व ग्रामपंचायत क्षेत्रात मोबाईल टॉवर अस्तित्वात होते.

• पनवेल नगरपालिकेमध्ये समाविष्ट असणाऱ्या २८ मोबाईल टॉवर कंपन्यांना मालमत्ता कर आकारण्यात येत होता.

• पनवेल महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामावर मालमत्ता कर वसुली करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे:-

• पनवेल महानगरपालिका स्थापनेपुर्वीच्या मोबाईल टॉवर्सना महानगरपालिकेमार्फत कागदपत्राची पुर्तता करण्याबाबत नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. सदर कागदपत्राची पुर्तता झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

• पनवेल महानगरपालिकेने नव्याने समाविष्ट झालेल्या क्षेत्रासाठी मोबाईल टावर्सना मालमत्ता कराप्रमाणे आकारणी करणे व विहीत शुल्क व फी आकारणी बाबतच्या प्रस्तावास महासभेने मंजुरी दिली आहे.

• तसेच महानगरपालिकेने संबंधित सोसायटींना पत्राद्वारे सुचित करुन परवानगी बाबतची मागणीपत्रे बजावली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई, गोखीवरे येथील पेट्रोल पंपास नियमबाह्य परवानगी दिल्याबाबत**

**(३०) ११०११३ (१८-०४-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई, गोखीवरे येथील पेट्रोल पंपास नियमबाह्य परवानगी दिल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर पेट्रोल पंपास सिडको व नगरविकास खात्याने परवानगी नाकारली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पेट्रोल पंप मालकावर कारवाई केली जाणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८)** : (१), (२), (३) व (४) सदर बाबतीत वसई-विरार शहर महानगरपालिकेस दिनांक ०४.०१.२०१६ रोजी तक्रार प्राप्त झालेली होती. वसई-विरार शहर महानगरपालिकेने संबंधित पेट्रोल पंपावर खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे:-

- सदर पेट्रोल पंपास महानगरपालिकेने दिनांक २८.१२.२०१७ अन्वये स्थगितीचे आदेश दिले होते.
- तद्नंतर सदर प्रस्तावाची परवानगी दिनांक ०१.०२.२०१८ रोजी रद्द करुन महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलमान्वये कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच ह्या प्रस्तावाची लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत स्वतंत्र चौकशी व कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मालमत्ता कराची वसूली सदनिकानिहाय करण्याचा ठराव**

**(३१) ११०३७४ (०३-०४-२०१८). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मालमत्ता कराची वसूली सदनिकानिहाय करण्याचा ठराव महानगरपालिमध्ये माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान संमत करण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ओसी नसलेल्या इमारतींमधूनही सदनिकानिहाय हा मालमत्ता कर वसूली करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याची अंमलबजावणी कधीपासून सुरु करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीमध्ये सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पेवर झालेल्या चर्चेदरम्यान, मालमत्ता कराची आकारणी ही प्रत्येक गाळेधारकावर/सदनिकाधारकावर स्वतंत्रपणे व्हावी असा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता.

त्यानुसार दिनांक ०१.०४.२०१८ नवीन इमारतींचे करनिर्धारण करतांना ते प्रथम करनिर्धारण दिनांकापासूनच सदनिकानिहाय/गाळेनिहाय पध्दतीने करण्यात यावे याकरिता महानगरपालिका प्रशासनामार्फत दिनांक ०६.०४.२०१८ अन्वये परिपत्रक जारी करण्यात आले आहे.
(२), (३) व (४) मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम २०९(अ) अन्वये नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या इमारतीमधील गाळेधारक/सदनिकाधारक यांना मालमत्ता कराची देयके स्वतंत्रपणे बजावण्याची तरतूद करण्यात आली आहे.

इमारतींमध्ये गाळेधारक/सदनिकाधारक यांचे मालमत्ता कर भरण्याचे स्वतंत्र दायित्व निश्चित करण्यात आले आहे.

तसेच, जुन्या करनिर्धारित इमारतींमध्ये त्यांच्या अर्जासापेक्ष व मालमत्ता कराचा भरणा पूर्ण केल्यानुसार सदनिकानिहाय देयके निर्गमित करण्यात येतात.

---

**वसई तालुक्यातील रस्त्याची कामे मुंबई-महानगर प्रदेश प्राधिकरणामार्फत करण्याबाबत**

**(३२) ११०४०० (०३-०४-२०१८). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुक्यातील मुंबई-महानगर प्रदेश प्राधिकरणामार्फत रस्त्याच्या करावयाच्या कामासंबंधी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १३ एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु निवेदनातील प्रमुख मागण्या काय आहेत व त्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१८) :** (१), (२) व (३) प्रश्नाधीन निवेदन प्राप्त झाले असून निवेदनातील पश्चिम सागरी जोड रस्ता (सी-लिंक) नॉर्थ एक्स्टेंन्शन वांद्रे - दहिसर- विरार या रस्त्याच्या मागणीच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुसाध्यता अभ्यास सुरु आहे.

सध्या दहिसर ते मिरा-भाईंदर मेट्रो प्रकल्पास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. सदर दहिसर- मिरा- भाईंदर मेट्रो मार्गिकेचा विरारपर्यंत विस्तार करण्याचे काम नियोजन स्तरावर आहे. याबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता प्राधिकरणामार्फत सल्लागार नियुक्त करण्यात येणार आहे.

---

**कुरुंदवाड (जि.कोल्हापूर) येथील संपूर्ण शहराचे सांडपाणी प्रकियेविना थेट आनवडी नदीत सोडण्यात येत असल्याबाबत**

**(३३) ११०४७२ (१८-०४-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरुंदवाड (जि.कोल्हापूर) येथील संपूर्ण शहराचे सांडपाणी प्रक्रीयेविना थेट आनवडी नदीत सोडण्यात येत असल्याबाबत तेथील नागरिकांनी संबधिताकडे तक्रार करुनही कोणतीच कारवाई करण्यात आली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कोणतीच कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने उक्त घनकचरा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

या संदर्भात तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(२) व (३) आनवडी ही नदी नसून संस्थानकालीन काढण्यात आलेला नाला आहे. कुरुंदवाड शहरात घरगुती वापरामुळे तयार होणारे १.१७ द.ल.लि. इतके सांडपाणी आनवडीमध्ये सोडण्यात येते. आनवडी नाल्यामध्ये बंधारा घालून सदर सांडपाणी अडविण्यात आले आहे. अडविण्यात आलेले सांडपाणी नाल्यालगत असणाऱ्या शेतीसाठी शेतकऱ्यांकडून व विट भट्टीसाठी कारखनादारांकडून वापरण्यात येते.
(४) शासनाने दि.१०.११.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन (डी.पी.आर) मंजूर केला आहे व त्यानुसार कुरुंदवाड नगरपरिषदेअंतर्गत घनकचरा व्यवस्थापनाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दौंड नगरपरिषद (जि.पुणे) हद्दीतील एस.आर.पी.एफ. च्या मालकीची जागा विविध विकासकामांसाठी नगरपरिषद आणि पंचायत समिती दौंड यांना देण्याबाबत**

**(३४) ११०५८५ (१८-०४-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड नगरपरिषद (जि.पुणे) हद्दीतील एस.आर.पी.एफ.च्या मालकीची जागा नाट्यगृह व क्रीडासंकुल बांधकाम करण्यासाठी दौंड नगरपरिषद आणि पंचायत समिती यांना देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २१ जुलै, २०१६ पासून ते दिनांक २ जानेवारी, २०१८ पर्यंत वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.गृहराज्य मंत्री यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत नाट्यगृह व क्रीडासंकुल याचा आराखडा तयार करून त्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्याचे आदेश मुख्य अभियंता पोलीस गृहनिर्माण वरा.रा.पो.बल गट ५ व ७ च्या सामादेशाकांना देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कामांसाठी जागा देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) एस.आर.पी.एफ. ला सदर जागेची आवश्यकता असल्याने त्याजागेऐवजी कृषी विभागेच्या बीजगुणन प्रक्रिया केंद्राच जागेपैकी २ एकर जागा नाट्यगृहासाठी व ८ एकर जागा क्रिडा संकुलासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३.०४.२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. सदर निर्णय कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, महसूल व वन विभाग व जिल्हाधिकारी, पुणे यांना कळविण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरात गच्चीवरील उपाहारगृहांना मान्यता देण्याबाबत**

**(३५) ११०९६१ (१८-०४-२०१८). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात गच्चीवरील उपाहारगृहांना मान्यता देण्याबाबतचे धोरण महानगरपालिकेने स्विकारल्यानंतर मुंबई व उपनगरात किती हॉटेल आस्थापनांनी उपाहारगृह सुरु करण्यास परवानगी मागितली होती त्यापैकी किती आस्थापनांना परवानगी देण्यात आली आहे,

(२) असल्यास, गच्चीवरील उपाहारगृहांना परवानगी कोणत्या अटी व शर्तीवर देण्यात आली आहे,

(३) असल्यास, सदर हॉटेल आस्थापनांनी गच्चीवरील उपाहारगृहे प्रत्यक्षात सुरु केली आहेत काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग (२) मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीची अंमलबजावणी संबंधित हॉटेल आस्थापनाकडून काटेकोरपणे केली जाते किंवा काय याची पहाणी करण्यासाठी कोणती यंत्रणा निर्माण करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१) मुंबई शहरात गच्चीवरील उपाहारगृहांना मान्यता देण्याबाबतचे धोरण महानगरपालिकेने स्विकारल्यानंतर मुंबई व उपनगरात १५ हॉटेल आस्थापनांकडून अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी २ हॉटेल आस्थापनांना अतिरिक्त सेवा कक्षासाठी परवानगी देण्यात आली आहे.

(२) गच्चीवरील उपाहारगृहांना खालील अटी व शर्तीवर परवानगी देण्यात आली आहे:-

• भोगवटा प्रमाणपत्र असलेल्या मंजूर इमारतीमधील खुल्या गच्ची/अंशत: खुली गच्ची/सामायिक खुली गच्ची (आश्रय क्षेत्राचा भाग सोडून) वर खानपान पुरविण्याकरिता परवानगीसाठी रितसर प्रस्ताव संबंधित विभागाच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्याकडे सादर करावा.

• वहिवाटदारांना कोणताही उपद्रव होऊ नये याकरिता खुल्या गच्चीवर/पॉकेट गच्चीवर/ सामायिक गच्चीवर (आश्रय क्षेत्राचा भाग सोडून) अन्नपदार्थ सेवा पुरविण्याच्या प्रस्तावासाठी केवळ व्यवसायिक वाणिज्य इमारत/खानपान व राहण्याची सोय असणा-या निवासी हॉटेलांचाच विचार करण्यात यावा.

• गच्चीवर एल.पी.जी. गॅस किंवा इतर ज्वलनशिल साधन वापरुन खाद्यपदार्थ/शिजवता व बनविता येणार नाहीत. फक्त इंडक्शन/मायक्रोवेव्ह आणि इलेक्ट्रीक ओव्हनचा वापर करण्याची परवानगी देण्यात येईल.

• अन्नपदार्थ सेवा पुरविण्याकरिता वापरावयाचे गच्चीक्षेत्र कोणत्याही तात्पुरत्या/कायमस्वरुपी आवरणाने आच्छादलेले नसावे. सदर खुल्या गच्चीवर पावसाळी छत/छत्री/ताडपत्री यांचे आवरण उभारण्यास परवानगी देण्यात येणार नाही. गच्चीसाठी व आवरणासाठी कोणतीही साधने उभारता येणार नाहीत व गच्चीचा वापर सदासर्वकाळ मोकळया आकाशाखाली असावा.

• गच्चीच्या सदर वापरामुळे शेजारील इमारतींना त्रास होणार नाही किंवा त्यांची तक्रार येणार नाही याची दक्षता घ्यावी. अशा प्रकारचा त्रास होत असल्यास, देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यात येईल.

• अन्नपदार्थ पुरविण्याची वेळ ही पोलिस कायदा आणि महानगरपालिका दुकाने आणि आस्थापना कायदा यातील तरतुदींनुसार असेल.

• गच्चीवरील विद्युत दिवे/रोषणाई आणि ध्वनीची तीव्रता ही सन १९८६ च्या पर्यावरण सुरक्षा कायद्याच्या संबंधित तरतुदीच्या अधीन असावी.

• अर्जदारास बृहन्मुंबई महानगरपालिका व त्यांचे अधिकारी यांस कोणताही धोका, तोडफोड, सुरक्षितता, मालमत्ता, जीवीतहानी तसेच न्यायालयीन लढाई वगैरे पासून कोणतेही नुकसान होणार नाही असे हमीपत्र दस्तऐवज (Indemnity Bond) सादर करावे लागेल.

• दुर्घटना किंवा अपघात टाळण्याकरिता परवानाधारकाने योग्य ती सुरक्षितता व दक्षतेसंदर्भात उपाययोजना योजाव्यात आणि अशा कोणत्याही दुर्घटनेस किंवा अपघातास परवानाधारक स्वतः जबाबदार राहील.

• गच्चीवर खाद्यसेवेच्या वापरासाठी परवाना दिलेल्या इमारतीच्या गच्चीच्या किनाऱ्यापासून १० मी. पर्यंत कोणतीही रहिवासी इमारत असू नये.

• जर गच्चीवर तटरक्षक भिंतीची उंची १.५ मी. पेक्षा कमी असेल तर ती जास्तीत जास्त उंची १.५ मी. पर्यंत जाळी किंवा उघडता येणाऱ्या काचेच्या तावदानाने अन्वयेच वाढवता येईल.

• परवानाधारकाने ग्राहकांना पुरविण्यात येणारे खाद्यपदार्थ खाण्यास योग्य असल्याबाबतची दक्षता घ्यावी. तसेच सदर अन्न आजुबाजूच्या झाडावरुन पडणारी पाने, पक्षांची विष्ठा, धूळ माशी यामुळे दुषित होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.

• खुल्या गच्चीस खाद्य पुरवठा करण्याची परवानगी देण्यापूर्वी मुख्य अग्निशमन अधिकारी यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करणे अनिवार्य आहे. व त्यांनी सुचविलेल्या सुरक्षिततेच्या बाबींबद्दलच्या अटींची पूर्तता केली असल्याची खात्री परवानगी देण्यापूर्वी करणे.

(३) सदर २ हॉटेल आस्थापनांनी गच्चीवरील उपाहारगृहे प्रत्यक्षात सुरु केली आहेत.

(४) सदर अटी व शर्तींच्या अंमलबजावणीसाठी महानगरपालिकेमार्फत विभाग पातळीवर फायर कम्प्लायन्स सेलची स्थापना करण्यात आली असून, त्याअंतर्गत आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील कर्मचारी व अग्निप्रतिबंधक उपाययोजनांच्या अंमलबजावणी /पुर्ततेबाबत अग्निशमन दलातील अधिकारी तसेच इमारतीच्या अनधिकृत बांधकामाबाबतची पाहणी महानगरपालिकेच्या इमारत व कारखाने विभागामार्पुत करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) शहरातील पद्मावती गार्डन व जिजामाता उद्यानामध्ये मुलभूत सोई-सुविधा नसल्याबाबत**

**(३६) १११११११ (१२-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) शहरातील पद्मावती गार्डन व जिजामाता उद्यानामध्ये वीज, पाणी, लहान मुलांचे खेळण्याचे साहित्य व इतर मुलभूत सोई-सुविधा उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांची व लहान मुलांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक नगरपालिका प्रशासन उपरोक्त उद्यान विकसित करण्याबाबत तसेच देखभाल करण्यात अपयशी ठरल्याचेही निदर्शनास येऊनही व स्थानिक नागरिकांनी प्रशासनाला अनेक तक्रारी देऊनही अद्याप याबाबत कोणताही विकास झाला नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त उद्यानाचे सुशोभिकरण व देखभाल दुरूस्ती तातडीने करणेसाठी शासनाने स्थानिक प्रशासनाला निर्देश देण्याची आवश्यकता असतांनाही अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१) वीज व पाणी या सुविधा उपलब्ध आहेत. तथापि, काही खेळाचे साहित्य नादुरुस्त होते. निधीच्या उपलब्धतेनुसार ते दुरुस्त करण्यात येत आहे.

(२) स्थानिक नागरिकांच्या कोणत्याही तक्रारी प्रशासनास प्राप्त झालेल्या नाहीत.

(३) व (४) उपलब्ध निधी विचारात घेऊन टप्प्याटप्प्याने उद्यानाचे सुशोभिकरण व नूतनीकरण करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**काळबादेवी येथील गोकुळ निवास इमारतीच्या आगीत शहीद झालेल्या अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना सवलती दिल्या जात नसल्याबाबत**

**(३७) ११११११४ (१२-०४-२०१८). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील काळबादेवी येथील गोकुळ निवास इमारतीच्या आगीत शहीद झालेल्या अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांच्या कुटुंबीयांना अजूनही सवलती दिल्या जात नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोफत घर, मुलांच्या शिक्षणाचा खर्च तसेच कुटुंबातील एका वारसाला नोकरी अशा सुविधा सदर कुटुंबांना मिळणे अपेक्षित होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहीदांच्या कुटुंबांना सुविधांपासून वंचित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी उपमहापौर यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती शहीद झालेल्या अग्निशमन अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना सवलती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१) काळबादेवी येथील गोकुळ निवास इमारतीला लागलेल्या आगीच्या दुर्घटनेत वीरमरण आलेल्या अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांना शहीद दर्जा व शहीदांना अनुज्ञेय असणाऱ्या सवलती आणि फायदे देण्याचा शासन निर्णय दिनांक २२.०७.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(२), (३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर चार शहीद अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना खालीलप्रमाणे सुविधा देण्यात आल्या/येत आहेत :-
• सदर अधिकाऱ्यांना त्यांच्या पदाच्या वर्गवारीनुसार कायमस्वरुपी सदनिका देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून, सद्य:स्थितीत जोपर्यंत सदनिका उपलब्ध होत नाही तोपर्यंत त्यांना अग्निशमन दलाच्या सेवा निवासस्थानात राहण्याची सुविधा देण्यात आली आहे.
• श्री. एस. डब्ल्यू. राणे यांच्या मुलाला कनिष्ठ अभियंता पदावर व श्री. एम. एम. देसाई यांच्या पत्नीला लिपिक पदावर नोकरी देण्यात आली आहे.
• श्री. एस. जी. अमिन यांच्या एका अपत्याला सज्ञान झाल्यानंतर व श्री. एस. एच. नेसरीकर यांच्या मुलाला अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याचा प्रस्ताव मंजुर करण्यात आला आहे.
• सदर शहीद अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना मूत्यु नुकसान भरपाई, शिल्लक रजा रोखीकरणाची रक्कम तात्काळ मदतीसह देण्यात आली आहे.
• शहीद अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान देण्यासाठी प्रत्येकी रु. २५ लाख इतक्या रकमेची तसेच, त्यांच्या मुलांच्या पदवीपर्यंतच्या शिक्षणासाठी रु. ३ लक्ष इतक्या रकमेची तरतुद बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.
• सदर अधिकारी मृत झालेले नाहीत असे समजून या अधिकाऱ्यांना वेतन व पदोन्नतीचे सर्व फायदे सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.
• शहीद श्री. नेसरीकर व श्री. देसाई हे पदोन्नती क्षेत्रात येत असल्याने, त्यांचे पदोन्नतीचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत.
• स्थायी समितीच्या मंजुरीने सेवानिवृत्ती पर्यंतच्या वेतनाचे अधिदान शहीद अधिकाऱ्यांच्या वारसांना देण्यात येणार आहे.

---

**पंढरपूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) नगरपालिकेंतर्गत चालविण्यात येणाऱ्या ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून गॅस तयार करण्याचा प्रकल्प बंद असल्याबाबत**

**(३८) १११६७१ (१२-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) नगरपालिका अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या ओल्या कचऱ्यावरील प्रक्रिया करून गॅस तयार करण्याचा प्रकल्प बंद असल्यामुळे पंढरपूर शहराचा हजारो टन कचरा उघड्यावर टाकला जात असल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी उघड्यावर कचरा पडून असल्यामुळे शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊन ताप, थंडी, डेंग्यु यासारख्या साथीच्या आजाराने नागरीक त्रस्त झाल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ओला कचऱ्यावर प्रक्रिया करून गॅस तयार करण्याचा प्रकल्प चालू करणेसाठी नगरपालिका प्रशासनाला वारंवार विनंती करूनही नगरपालिका कचरा विघटन करणारी यंत्रणा उपलब्ध करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत स्थानिक प्रशासनास निर्देश दिले आहेत काय, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.

सदर प्रकल्प सन २०१४ च्या अखेरपर्यंत कार्यान्वित होता. तथापि, त्यानंतर तो नादुरुस्त झाला व दुरुस्तीची कार्यवाही नोव्हेंबर, २०१७ मध्ये पूर्ण करुन प्रकल्प पुन्हा सुरु करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

प्रकल्प बंद असतांना कचऱ्याचे हिप कंपोष्टींग करुन कचऱ्यापासून बायोमायनिंग प्रक्रियेद्वारे खतनिर्मितीची प्रक्रिया चालू करण्यात आली होती. डेंग्यूचे संशयित रुग्ण आढळून आलेले असले तरी तपासणीअंती त्यांना डेंग्यू झाला नसल्याचे निष्पन्न झाले आहे.

(३) सदर प्रकल्प सुरु करण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर शहराची केंद्र शासनाच्या व युरोपियन सरकारच्या संयुक्त शाश्वत नागरी विकास योजनेसाठी निवड झाल्याबाबत**

**(३९) १११८९८ (१२-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहराची केंद्र शासनाच्या व युरोपियन सरकारच्या संयुक्त शाश्वत नागरी विकास योजनेसाठी निवड झाली असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, युरोपातील शहर व भारतातील शहर यांचा संयुक्त अभ्यास करुन आपले शहर विकसीत करण्यासाठी प्रस्ताव देण्याबाबत सोलापूर महानगरपालिकेस युरोपियन युनियनचे पत्र आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रस्तावानुसार शहरातील नागरी सुधारणांचा अभ्यास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, यासंदर्भात युरोपियन युनियनचे दि.२१.०९.२०१७ आणि दि.२०.१२.२०१७ रोजी महानगरपालिकेस पत्र आले होते.
(३) सोलापूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभा ठराव क्र.७७ दि.११.०५.२०१८ अन्वये सामंजस्य करार करण्यास मंजूरी देण्यात आली.
त्यानुषंगाने सोलापूर महानगरपालिकेने स्पेन देशातील मुर्शिया या शहरासमवेत दि.२४.०५.२०१८ रोजी सामंजस्य करार केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तासगाव (जि.सांगली) नगरपरिषदेकडे विकास कामाचा निधी वापराविना पडून असल्याबाबत**

**(४०) १११९०५ (१२-०४-२०१८). श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तासगाव (जि.सांगली) नगरपरिषदेकडे विकास कामांचा सुमारे ३५० कोटींचा मंजूर निधी वापराविना पडून असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार तासगांव नगरपरिषदेस मंजूर झालेला ३५० कोटी रुपयांचा निधी वापरुन विकासकामे पूर्ण क्षमतेने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१) व (२) अशी बाब नाही.
तासगाव नगरपरिषदेस सन २०१४-१५ ते २०१६-१७ या तीन वर्षात वैशिष्ट्यपूर्ण, रस्ता अनुदान व ठोक अनुदान या योजनेअंतर्गत एकूण रूपये २९ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला होता. यापैकी रूपये १२.८१ कोटी इतका निधी खर्च झाला असून रूपये १६.१९

कोटी इतका निधी अखर्चिक आहे. तथापि अखर्चिक निधी संदर्भातील कामे प्रगती पथावर आहेत. शासनाने शासन निर्णय दि.१२.०३.२०१८ अन्वये अखर्चिक निधीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या रक्षणासाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याबाबत

**(४१) ११२४२८ (०३-०४-२०१८). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या रक्षणासाठी रस्ते, उद्यान, शाळा, रुग्णालय आदि ठिकाणी तसेच महानगरपालिकेच्या शाळांच्या सुरक्षतेसाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.आयुक्त, मुंबई महानगरपलिका यांच्याकडे लेखी तक्रार केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या रक्षणासाठी रस्ते, उद्याने, शाळा, रुग्णालये आदि ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या दिनांक २६.१०.२०१७ रोजीच्या सभेत विचारात घेण्यात आला.

तथापि, सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या प्रक्रियेतून महानगरपालिकेच्या अखत्यारीतील शाळा, उद्याने, मैदाने इत्यादी ठिकाणी सद्य:स्थितीत वगळण्यात आली आहे व याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींना दिनांक २२.११.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या के.ई.एम., सायन, नायर, कुपर इत्यादी प्रमुख रुग्णालयांमध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून, उर्वरित सर्व रुग्णालयांमध्ये व प्रसुतीगृहांमध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

महानगरपालिका शालेय इमारतीमधून विद्यार्थी व सामग्रीच्या संरक्षणासाठी कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

शाळेतील विद्यार्थी, शिक्षक असे मानव संसाधन, शालेय परिसर, शालेय इमारत, साधनसामुग्री आदि भौतिक सुविधांना असामाजिक तत्वांपासून, समाजकंटकांपासून सुरक्षितता मिळण्यास मदत होण्याच्या दृष्टीने सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याकरिता महानगरपालिका शाळांचे सर्वेक्षण पूर्ण झाले असून, सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

---

**उरूळी कांचन (ता.हवेली, जि.पुणे) ग्रामपंचायतीस नगरपरिषदेचा दर्जा देणेबाबत**

**(४२) ११३१९७ (१२-०४-२०१८). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरूळी कांचन (ता.हवेली, जि.पुणे) ग्रामपंचायत हद्दीतील वाढत नागरीकरणाला आवश्क सोईसुविधा पुरविण्यासाठी ग्रामपंचायतीस नगरपरिषदेचा दर्जा मिळावा अशा मागणीचा ठराव दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास ग्रामसभेत मंजूर करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरूळी कांचन ग्रामपंचायतीने गत अनेक वर्षांपासून नगर परिषदेचा दर्जा मिळावा अशी मागणी अनेक दिवसांपासून शासनाकडे केली असूनही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उरूळी कांचन गावाची लोकसंख्या ७० हजारांपेक्षा जास्त व मतदारांची संख्या २४ अजारांपेक्षा जास्त असल्याने ग्रामपंचायतींना सुविधा पुरविणे अवघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उरूळी कांचन ग्रामपंचायतीस नगरपरिषदेचा दर्जा देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) यासंदर्भात जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडून महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील निकषांची तपासणी करुन शासनास प्रस्ताव सादर करणे अपेक्षित आहे. जिल्हाधिकारी, पुणे यांनी यासंदर्भात काही बाबींचा तपशील ग्राम पंचायतीकडून मागविला आहे. अद्याप याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये असलेल्या अपूऱ्या सुरक्षा व्यवस्थेचा त्रास रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांना होत असल्याबाबत**

**(४३) ११३३७३ (१८-०४-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईकरांना सेवा देणाऱ्या मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये असलेल्या अपूऱ्या सुरक्षा व्यवस्थेचा त्रास रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांना होत असल्याची बाब माहे जानेवारी,२०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,मुंबई महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे देखील बसविण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,मुंबई महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांत पुरेशी व कार्यक्षम सुरक्षा व्यवस्था, सी.सी.टी.व्ही. कॅमेरे तातडीने बसविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१) महाराष्ट्र राज्य सिक्युरिटी कॉर्पोरेशन यांचेमार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. रुग्णालयात १४३, सायन रुग्णालय १३५ व नायर रुग्णालयात ९३ अतिरिक्त सुरक्षा रक्षक नेमण्यात आले आहेत.

तसेच, सुरक्षा रक्षक मंडळ यांचेमार्फत के.ई.एम. रुग्णालयात ६४, सायन रुग्णालय ५८ व नायर रुग्णालयात १५ अतिरिक्त सुरक्षा रक्षक नेमण्यात आले आहेत.
(२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम., सायन, नायर व कुपर या रुग्णालयांत सन २०१७ मध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून, उर्वरित रुग्णालये व प्रसुतीगृहे येथे सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये आवश्यकतेनुसार ध्वनीक्षेपण यंत्रणा बसविण्याबाबत**

**(४४) ११३८८६ (१२-०४-२०१८). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये आवश्यकतेनुसार ध्वनीक्षेपण यंत्रणा बसविण्याचे काम तीन कंत्राटदारांना विभागून देण्यात आले असून या कामासाठी जवळजवळ रु.१३.७१ कोटी इतका खर्च येणार आहे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामासाठी एकूण किती निविदा प्राप्त झाल्या होत्या त्यापैकी जास्तीत जास्त व कमीत कमी किंमतीच्या निविदा कोणत्या होत्या, उक्त कामासाठी नियुक्त केलेल्या कंपन्यांची निवड कोणत्या निकषावर करण्यात आली आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०८-२०१८) :** (१) हे खरे आहे.

सदर काम जलदगतीने होण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळा तीन गटांमध्ये विभागण्यात आल्या व प्रत्येक गटासाठी एक कंत्राटदार असे तीन कंत्राटदार नेमण्यात आले.
(२) सदर कामासाठी प्रत्येक गटासाठी ५ निविदा प्राप्त झाल्या, त्यापैकी १ निविदा तांत्रिक छाननीमध्ये अप्रतिसादात्मक ठरल्याने प्रत्येक गटासाठी ४ निविदा प्रतिसादात्मक झाल्या.

सदर प्रतिसादात्मक निविदाकारांच्या आर्थिक देकारानुसार प्रत्येक गटासाठी प्राप्त जास्तीत जास्त व कमीत कमी किंमतीच्या निविदा खालीलप्रमाणे आहेत :-

**गट क्र. १**

• जास्तीत जास्त किंमतीची निविदा:- मे. हायटेक ऑडीओ सिस्टीम प्रा.लि.

• कमीत कमी किंमतीची निविदा:- मे. स्टार ट्रेडर्स

**गट क्र. २**

• जास्तीत जास्त किंमतीची निविदा:- मे. हायटेक ऑडीओ सिस्टीम प्रा.लि.

• कमीत कमी किंमतीची निविदा:- मे. सिस्टीम आर्किटेक्ट ऍण्ड इंजिनिअर्स

**गट क्र. ३**

• जास्तीत जास्त किंमतीची निविदा:- मे. स्टार ट्रेडर्स, मे. कॉमटेक टॅली सो. प्रा.लि. व मे. सिस्टीम आर्किटेक्ट ऍण्ड इंजिनिअर्स

• कमीत कमी किंमतीची निविदा:- मे. हायटेक ऑडीओ सिस्टीम प्रा.लि.

उक्त कामांसाठी नियुक्त केलेल्या कंपन्यांची निवड ही प्रत्येक गटातील लघुत्तम देकाराच्या आधारे निविदेतील अटी व शर्तींनुसार करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे येथील मुंब्रा परिसरातील नागरीकांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाईबाबत**

**(४५) ११४०९५ (१२-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील मुंब्रा परिसरातील नागरीकांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाई निवारणासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता व सर्व सबंधितांसमवेत दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मुंब्रा येथे बैठक घेतलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०७-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) रेतीबंदर येथील अमित गार्डन हॉटेल शेजारील जलवाहिनी मुख्य रस्त्यावर खाडीलगत तसेच भूमीगत असल्याने गॅस टेक्नीक वापरून रेतीबंदर येथील ८१३ मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीतून होणारी पाणी गळती शोधून पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला, असे ठाणे महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे महानगरपालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील औषधाचे दुकान बंद असल्याबाबत**

**(४६) ११४६७९ (१२-०४-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील औषधाचे दुकान गत वर्षभरापासून बंद असल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांचे प्रचंड हाल होत असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांच्या नातेवाईकांना बाहेरील औषध दुकानातून औषध घ्यावे लागत असून ही दुकाने लहान असल्याने तातडीची शस्त्रक्रियेवरील साहित्य व इंजेक्शन त्यांच्याकडे मिळत नसल्याने परत त्यांना ठाणे येथे हेलपाटे मारावे लागत असल्याने वेळ आणि पैसा वाया जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी महानगरपालिका प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याने त्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१) ठाणे महानगरपालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील औषधांचे दुकान कंत्राटदाराने माहे २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी सुरु केले व निविदेनुसार संपुर्ण मासिक भाडे प्रदान न करता TDS व सेवा कर वजा करून उर्वरित रक्कम मासिक भाडे म्हणून नोव्हेंबर, २०१६ पर्यंत प्रदान केले आहे.

परंतु, TDS व सेवा कर शासनाच्या संबंधित खात्यात भरल्याची कागदपत्रे वारंवार मागणी करूनही कंत्राटदाराने सादर केली नसल्याने ठाणे महापालिकेने सदर दुकान दिनांक ०१.०४.२०१७ रोजी सीलबंद केले आहे.

ठाणे महानगरपालिकेने कंत्राटदाराकडून एकुण रुपये १,०५,७८,४९३/- ची दिनांक ३१.१०.२०१७ रोजी थकबाकी असल्याचे कळविले आहे.

(२) व (३) कंत्राटदाराने थकीत रक्कम वसुल करण्याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही केल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे:-

- कंत्राटदाराची निविदा अनामत व सुरक्षा अनामत रक्कम एकूण रुपये ४७,३०,०००/- जप्त करण्यात आले आहेत.
- दुकानातील जप्त मालाची रक्कम वसुल योग्य रकमेत समायोजित करण्यात येणार आहे.
- दुकानाच्या रोख पेटीतील रुपये ५०,३८०/- इतकी रक्कम जप्त करण्यात आली आहे.
- उर्वरीत रक्कम वसुल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वर्धा शहरातील रामनगर परिसरातील भुखंड धारकांच्या प्रलंबित लीज नुतनीकरण करण्याबाबत

**(४७) ११४७२७ (१२-०४-२०१८). डॉ.पंकज भोयर (वर्धा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा शहरातील रामनगर परिसरातील भुखंडधारकांच्या प्रलंबित असलेल्या लीज नुतनीकरण करण्याबाबत शासनाने परवानगी दिली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भुखंडधारकांना स्थानिक प्रशासनाद्वारे लीज नुतनीकरण करारनामे करुन देण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ह्या भुखंडधारकांना अजूनपर्यंत हे भुखंड हस्तांतरण/विक्री करण्याची परवानगी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लीज नुतनीकरणाकरिता जिल्हा प्रशासनाकडे काही प्रस्ताव आले आहेत काय, त्यापैकी किती प्रकरणे निकाली काढली आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१) होय, दि.२६.०३.२०१५ च्या शासन पत्रान्वये सन १९९१ ते सन २०२१ या ३० वर्षाच्या कालावधीसाठी लीजच्या नुतनीकरणास मान्यता देण्यात आली आहे.

(२), (३) व (४) • मूळ लीजकरार हे ७०७ भूखंड धारकांसमवेत होते.

• तथापि, काही भूखंडधारकांनी त्यांच्याकडील भूखंडाचे तुकडे पाडून त्याचा भाग परस्पर, नगरपरिषदेची मान्यता न घेता विक्री केल्याने सद्य:स्थितीत एकूण भूखंडधारकांची संख्या वाढून १०५६ एवढी झाली.

• १०५६ भूखंडधारकांपैकी ६०७ भूखंड धारकांनी लीज नूतनीकरणासाठीचे प्रस्ताव नगरपरिषदेस सादर केलेले आहेत. त्यापैकी ३२१ भूखंडधारकांकडे नोंदणीकृत दस्तऐवज (करार) असल्याने त्यांच्या प्रकरणी लीज नूतनीकरण करार करण्यात आले आहेत.

• २८६ भूखंडधारकानी (जे मूळ लीज धारक नाहीत) नोंदणीकृत दस्तऐवज (करार) सादर केलेली नाहीत त्यांना ते सादर करण्यास कळविण्यात आले असून, ते सादर झाल्यावर त्यांच्या प्रकरणी लीज नूतनीकरणाबाबत कार्यवाही करणे शक्य होईल.

• उर्वरित ४४९ भूखंडधारकानी अद्याप कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. त्यांना तात्काळ नूतनीकरणासाठीचा प्रस्ताव नोंदणीकृत दस्तऐवजासह (करारनामा) सादर करण्यास कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर शहरातील महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या शाळेतील खुल्या प्रवर्गातील विदयार्थ्यांना महानगरपालिका निधीतून गणवेश खरेदी करण्यासाठी निधी मिळाला नसल्याबाबत

**(४८) ११५४९२ (१२-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या शाळेत प्रविष्ट असलेल्या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना महानगरपालिका निधीतून गणवेश खरेदी करण्यासाठी निधी देण्यात येतो परंतू सोलापूर शहरातील विद्यार्थ्यांना अद्यापपर्यंत गणवेश मिळाला नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे आहे. निधी अभावी सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करुन देता आलेला नाही.

दरम्यान सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात महानगरपालिका शाळेतील खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना गणवेश पुरविण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, सोलापूर महानगरपालिका यांनी आदेश दिले आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांना गणवेश पुरविण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

---

## सोलापूर (जि.सोलापूर) शहर विकासासाठी व महानगरपालिकेबाबत निर्णय घेण्यासाठी कोअर कमिटी गठीत करण्याबाबत

**(४९) ११५५०६ (१२-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर (जि.सोलापूर) शहर विकासासाठी व महानगरपालिकेबाबत निर्णय घेण्यासाठी कोअर कमिटी गठीत करा अशी सूचना मा.मुख्यमंत्री यांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर शहर विकासासाठी कोअर कमिटी गठीत करण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१८) :** (१) अशी सूचना केल्याचे दिसून येत नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई क्षेत्रातील सिडको प्राधिकरणाने विविध राज्यांना भुखंडाचे वाटप केल्याबाबत**

**(५०) ११५६९४ (१२-०४-२०१८). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई क्षेत्रातील सिडको प्राधिकरणाने विविध राज्यांना भुखंडाचे वाटप केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भुखंडाचे वाटप ज्या प्रयोजनाकरीता केले आहे त्याच प्रयोजनासाठी भुखंडाचा वापर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, अशा किती राज्यांनी बेकायदेशीरपणे प्रयोजन बदलून भुखंडाचा वापर केला आहे व त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास सदर भुखंडाचे वाटप करीत असताना अनियमितता आणि कायद्याचे उल्लंघन झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आणि त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) सिडको संचाकल मंडळाचा ठराव क्र.५६१९, दि.६.५.१९९२ नुसार १५ राज्यांना अतिथीगृह व इंपोरियम या प्रयोजनासाठी वाशी, नवी मुंबई येथील सेक्टर ३० येथील भूखंडांचे वाटप करण्यात आले आहे. त्यापैकी अरुणाचल प्रदेश राज्य शासनास वाटप केलेल्या भूखंडाचा वापर इतर प्रयोजनार्थ केल्याने सिडकोने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून दि.३१.१२.२०१५ च्या आदेशानुसार करारनामा रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु याबाबत अरुणाचल प्रदेश यांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेली रिट याचिका क्र.२७३०/२०१६ मध्ये मा. न्यायालयाने कठोरतम कार्यवाही न करण्याचे आदेश दिले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**

**मुंबई.** **प्रधान सचिव,**

**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.